Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# चंद्रपूर महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com ● mahasagarngp@gmail.com

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.

महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6

* वर्ष ४५ * अंक २७२ * | * चंद्रपूर * | शनिवार, दिनांक २९ मार्च २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्रलेख

## खरीखरी..

## माणिकरावांची माया

विधिमंडळाचे अधिवेशन संपलेच आहे. त्या अधिवेशनात काय झाले. यापेक्षा काय झाले नाही, याची चर्चा अधिक झाली. सर्वात महत्त्वाचा मुद्दा होता. तो म्हणजे महागाई आणि शेतकऱ्यांचा. विशेषतः शेतकऱ्यांच्या पिकांना वाजवी भाव मिळत नाही. अशी ओरड अनेक बाजूंनी होत होती. कापूस काय, सोयाबीन काय आणि आता तूर काय या सर्वांमध्ये सरकारने घोषित केलेले समर्थन मूल्य मिळत नव्हते. तिकडे विमा कंपन्या नुकसान भरपाईचे दावे स्वीकारण्याऐवजी मूग गिळून गप्प बसणे हेच कार्य करीत होत्या. शेतकऱ्यांच्या समोर केवळ हाच एक प्रश्न नव्हता. तर शेतमजुरांची टंचाई आणि त्यामुळे मजुरीच्या दरामधील महागाई शेतकऱ्यांना जिवंतपणे मारून टाकण्यास सज्ज झालेली होती. अशा चारी बाजूंनी असलेल्या भयाण परिस्थितीत जणू रूक्ष वाळवंटात एखादा पाण्याचा झरा दिसावा. त्याप्रमाणे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांसाठी दोन महत्त्वाच्या घोषणा केल्या. या घोषणांमुळे शेतकऱ्यांच्या पदरी फुल ना फुलाची पाकळी तरी पडणार आहे. या कृषी क्षेत्रातील विमा कंपन्या कोट्यवधी रुपयांचा नफा कमवीत आहेत. अशा परिस्थितीमध्ये या घोषणा म्हणजे शेतकऱ्यांसाठी थोडासा तरी दिलासा आहेत. शेतकऱ्यांना विम्याच्या नुकसान भरपाई पोटी 2555 कोटी शासन विमा नुकसान भरपाई देणार आहे. त्यासाठी मंजुरीही देण्यात आलेली आहे. सरकारने एकूण परिस्थितीचा आढावा घेऊन विमा कंपन्यांना वरील रक्कम तत्काळ देण्याची सूचना केलेली आहे. ही सूचना आहे की आदेश आहे. ते आम्हाला ठाऊक नाही. सूचना असेल तर ती या कानाने ऐकून त्या कानाने सोडून देता येते आणि जर का हा आदेश असेल. तर दोन्ही कानांनी ऐकून कानोकानी विचार न करता विमा कंपन्यांना ही रक्कम नुकसानग्रस्त शेतक?यांना द्यावीच लागेल. अनेक विमा कंपन्यांपैकी काही कंपन्या भारतीय नाहीत. या कंपन्या सरकारी सूचना कशा अवाजवी आहेत. त्यासाठी वातावरण निर्मिती करू शकतात. शेतकऱ्यांचे जे अतोनात नुकसान झाले आहे. ते उघड्या टक्क डोळ्यांनी दिसत असतानाही या विमा कंपन्या वेड पांघरून पेडगावला जाण्याचे नाटक करीतच असतात. ज्या ज्या कृषी विमा कंपन्या सरकारी सूचना व आदेशाचे पालन करीत नाहीत. त्यांना केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशातील कोणत्याही राज्यात शेतकऱ्यांचा विमा काढण्याची परवानगीच देऊ नये. हाच एकमात्र यावरील उपाय ठरू शकतो. कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दुसरी घोषणा शेतकऱ्यांच्या वीज बिलाबाबत केलेली आहे. या घोषणेप्रमाणे शेतकऱ्यांना 2029 पर्यंत मोफत वीज मिळणे अपेक्षित आहे. त्यासाठी ही निधीची तरतूद करून मंजुरी देण्यात आलेली आहे. खरंतर घोषणा करण्यात आल्याप्रमाणे ही योजना पाच वर्षांसाठी पूर्वीही होती व आहे. अजून त्याचे वर्षही पूर्ण झालेले नाही आणि कृषी मंत्र्यांना योजना चालू ठेवण्याची घोषणा पुन्हा जाहीरपणे करावी लागते. ही खरोखरच आश्चर्याची बाब आहे. त्यातच या विजेचीही मोठी गंमतच आहे. अनेक भागात ही वीज रात्री देण्यात येते. त्यामुळे शेतकऱ्यांना अशीही झोप लागत नाही आणि तशीही झोप घेता येत नाही. अशा या विजेच्या अवेळी पुरवठ्याबाबत लाखो शेतकऱ्यांनी हजारो निवेदने दिलेली आहेत. त्यामुळे सरकारने मोफत वीज योजना चालू ठेवताना वीज पुरवठा निदान सूर्यप्रकाशाच्या साक्षीने मिळेल. याची तजवीज केली, तर सोन्याहून पिवळे होईल. बळीराजा यापुढे तरी अव्यवस्थेला बळी पडणार नाही. हे पाहण्याचे काम सरकारला आता करावेच लागेल. 'ज्या ज्या ठिकाणी काही कमी, तिथे उभे आहोत आम्ही' म्हणजे सरकार आपल्यासाठी उभे आहे. हे शेतकऱ्यांना दिसले पाहिजे. आपल्या राज्यापेक्षा इतर अनेक राज्यात शेतकऱ्यांसाठी कितीतरी सवलती सुरू आहेत. त्याचे अनुकरण थोड्याफार प्रमाणात केले. तरी हे दुःखी शेतकरी एखादी सुखाची झुळूक अनुभवू शकतात. शेतकऱ्यांच्या हितासाठी कृषिमंत्री कोकाटे यांनी सध्यातरी शेतकऱ्यांच्या मार्गावरील काटे दूर करण्याचे काम केलेच आहे. त्यातून कृषिमंत्री शेतकऱ्यांच्या हितासाठी कटिबद्ध आहेत. हे ही दिसून येत आहे. हीच खरी समाधानाची बाब आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# म्यानमार-थायलंडमध्ये विनाशकारी भूकंप

# दीडशेवर नागरिकांचा मृत्यू







■ वृत्तसंस्था, बँकॉक, दि. २८ :
आज सकाळी म्यानमारमध्ये ७.७ तीव्रतेचा भूकंप झाला. या भूकंपाचे धक्के म्यानमार, थायलंड तसेच भारत, बांगलादेश आणि चीनमध्ये जाणवले. या भुकंपात दीडशेपेक्षा अधिक नागाकिांना जीव गमवावा लागल्याची माहिती आहे. या ५ देशांच्या वेगवेगळ्या भागात शेकडो लोक घाबरून घरे आणि कार्यालये सोडून पळून गेले.

म्यानमारमधील मंडाले विमानतळावर उपस्थित असलेले लोक टॅक्सीवेवरच बसले होते. या काळात अनेक इमारती जमीनदोस्त झाल्या. थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये बांधकाम सुरू असलेली ३० मजली इमारत कोसळली. या साईटवर ४०० लोक काम करत होते.

भूकंपाच्या धक्क्यामुळे बँकॉकमध्ये बांधकाम सुरू असलेली एक इमारत कोसळली. येथे ढिगाऱ्याखाली अनेक लोक अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शुक्रवारी सकाळी ११:५० वाजता म्यानमारमध्ये ७.७ तीव्रतेचा भूकंप झाला. भारत, थायलंड, बांगलादेश आणि चीनसह पाच देशांमध्ये त्याचे धक्के जाणवले. म्यानमार आणि थायलंडमध्ये २३ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.

म्यानमारमध्ये २० जणांचा मृत्यू झाला, तर येथे ३०० जण जखमी झाले. त्याच वेळी, थायलंडची राजधानी बँकॉकमध्ये बांधकाम सुरू असलेली ३० मजली इमारत कोसळली. या साईटवर ४०० लोक काम करत होते. यापैकी ८० लोक बेपत्ता आहेत, तर ३७ जणांचा मृत्यू झाला आहे.

या ५ देशांच्या वेगवेगळ्या भागात शेकडो लोक घाबरून घरे आणि कार्यालये सोडून पळून गेले. मोठ्या प्रमाणात झालेल्या विध्वंसामुळे थायलंडचे पंतप्रधान पिथोंगटार्न शिनावात्रा यांनी आणीबाणी जाहीर केली आहे.

यूएस जिओलॉजिकल सर्व्हे आणि जर्मन रिसर्च सेंटर फॉर जिओसायन्सेस नुसार, मध्य म्यानमारमध्ये ७.७ तीव्रतेचा शक्तिशाली भूकंप झाला. भूकंपाचा केंद्रबिंदू सागाईंग शहराच्या वायव्येस १६ किमी (१० मैल) अंतरावर १० किमी खोलीवर होता.

म्यानमार, थायलंड, बांगलादेश, भारत आणि नैऋत्य चीनसह ५ देशांमध्ये याचा परिणाम दिसून आला. येथील अनेक भागात जोरदार भूकंपाचे धक्के जाणवले. पीटीआय वृत्तसंस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, भारतातील कोलकाता, इंफाळ, मेघालय आणि ईस्ट कार्गो हिलमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले. ढाका, चितगावसह बांगलादेशातील अनेक भागांना ७.३ रिश्टर स्केल तीव्रतेचे भूकंपाचे धक्के बसले. बारा मिनिटांनंतर, म्यानमारमध्ये ६.४ तीव्रतेचा आणखी एक भूकंपाचा धक्का बसला.

म्यानमारमधील ऐतिहासिक राजवाडा मंडाले पॅलेसच्या काही भागांचे नुकसान झाले आहे. त्याच वेळी, भूकंपात सागाईंग प्रदेशातील सागाईंग टाउनशिपमधील एक पूल पूर्णपणे उद्ध्वस्त झाला. राजधानी नायपिताव व्यतिरिक्त, क्युक्से, पिन ओओ ल्विन आणि श्वेबो येथे भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. या शहरांची लोकसंख्या ५० हजारांपेक्षा जास्त आहे.

दरम्यान, म्यानमार, थायलंडमध्ये अनेक भारतीय अडकून पडले असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

## मोदींच्या दौऱ्यासाठी तगडा बंदोबस्त

### सुरक्षेसाठी चार हजारांहून अधिक पोलिस तैनात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :



गुढीपाडव्याला ३० मार्च रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी नागपुरात येत आहेत. त्यांच्या सुरक्षेसाठी शहरात चार हजारांहून अधिक पोलिस तैनात केले जाणार आहेत. राज्य राखीव पोलिस दलाच्या पाच तुकड्या आणि दीड हजारांहून अधिक होमगार्ड यांचीही मदत घेतली जाणार आहे.

पंतप्रधान मोदी १२ वर्षांनंतर रेशीम बागेतील स्मृति मंदिराला भेट देणार आहेत. ते या मंदिराला भेट देणारे पहिले पंतप्रधान ठरतील. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षात हा दौरा ऐतिहासिक मानला जात आहे.
पंतप्रधानांचे सकाळी ८.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन होईल. त्यानंतर ते रेशीम बागेतील डॉ. हेडगेवार स्मृति मंदिरात आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार आणि द्वितीय सर संघचालक गोळवलकर गुरूजी यांच्या स्मृतींना अभिवादन करतील.

सकाळी ९ वाजता दीक्षाभूमी येथे जाऊन ३ ते ५ मिनिटे ध्यान करतील. त्यानंतर सकाळी १० वाजता वासुदेव नगर परिसरातील माधव नेत्रालयाच्या इमारतीचे भूमिपूजन करतील. कार्यक्रमानंतर विमानतळावरून विशेष हेलिकॉप्टरने बाजारगाव येथील सोलार एक्सप्लोझिव्ह शस्त्र निर्मिती कारखान्याला भेट देणार आहेत.

भाजपने पंतप्रधानांच्या स्वागतासाठी मोठी तयारी केली आहे. त्यांच्या मार्गावरील ३० किलोमीटरचा रस्ता आणि ४७ चौक सुशोभित केले जाणार आहेत. विविध राज्ये आणि संप्रदायाच्या परंपरेनुसार वेशभूषेत कार्यकर्ते स्वागत करणार आहेत.

## भारतीय रेल्वेत होणार कोंकण रेल्वेचा समावेश

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :
कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. चे भारतीय रेल्वेत विलिनीकरण करण्यास महाराष्ट्र शासनाने नुकतीच मान्यता दिली आहे. केरळ, कर्नाटक आणि गोवा राज्यही विलिनीकरणास अनुकूल असून रेल्वे मंत्रालयाने याबाबत तातडीने ठोस पावले उचलून कोकण रेल्वेच्या विलिनीकरणाला गती द्यावी, अशी आग्रही मागणी ठाणे लोकसभेचे खासदार नरेश म्हस्के यांनी आज संसदेत केली.

कोकण रेल्वेची स्थापना 1990 च्या दशकात एका ऐतिहासिक पावलासारखी झाली. महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक आणि केरळ यांना जोडत पश्चिम किनारपट्टीच्या भागाला कोकण रेल्वेमुळे नवी गती दिली गेली. भारतीय रेल्वेने यामध्ये 51 टक्के भांडवली गुंतवणूक केली. तर महाराष्ट्र 22 टक्के, कर्नाटक 15 टक्के, गोवा 6 टक्के आणि केरळ राज्य शासनाने 6 टक्के आर्थिक भागीदारी केली होती. वास्तविक मूळ करारामध्ये 10 वर्षांच्या आत कोकण रेल्वे कॉर्पोरेशनचे भारतीय रेल्वेत विलीनीकरण होणे अपेक्षित होते, मात्र दुदैवाने आजतागायत विलिनीकरण पूर्ण झाले नसल्याची खंत खासदार नरेश म्हस्के यांनी व्यक्त केली.

कोकण रेल्वेची क्षमता 175 टक्क्यांपर्यंत वापरली जात आहे. परंतु नवीन प्रवासी गाड्या व मालवाहतूक गाड्यांची सुरुवात होऊ शकत नाही. कारण निधीची मोठी कमतरता आहे. देशाच्या इतर भागात रेल्वेला केंद्र सरकारकडून मोठे अर्थसहाय्य मिळते, तर कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. हे स्वतंत्र कॉर्पोरेशन असल्यामुळे ते या सहाय्यापासून वंचित राहिले आहे, असे नरेश म्हस्के म्हणाले.

## कुणाल कामराची मद्रास हायकोर्टात धाव

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरील टीकात्मक गाण्यामुळे अडचणीत सापडलेल्या कुणाल कामराने अटकेपासून संरक्षण मिळवण्यासाठी मद्रास हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. या याचिकेवर आज किंवा उद्या सुनावणी होण्याची शक्यता आहे. दरम्यान, भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी या प्रकरणी कुणाल कामरावर टीकेची झोड उठवत त्याच्या 'आयुष्याची कॉमेडी' करण्याचा इशारा दिला आहे.

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामराच्या एका व्यंगात्मक गाण्याचा व्हिडिओ सोशल मीडियात चांगलाच व्हायरल झाला आहे. त्याने शिंदे यांचे नाव न घेता त्यांचा उल्लेख गद्दार असा केला होता. त्याच्या या विधानामुळे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी कामराच्या हॅबिटेट स्टुडिओची तोडफोड केली होती. या प्रकरणी मुंबई पोलिसांनी कामराविरोधात समन्स बजावला आहे.

या पार्श्वभूमीवर कुणाल कामराने मद्रास हायकोर्टात धाव घेऊन अटकेपासून संरक्षण देण्याची मागणी केली आहे. कामराने आपल्या वकिलांकरवी ही अटकपूर्व याचिका दाखल केली आहे. त्यात त्यांनी आपल्याविरोधात दाखल एफआयआर संदर्भात ट्रान्झिट अटकपूर्व जामिनाची मागणी केली आहे.

## कोट्यवधीचा महसुल बुडविणाऱ्या अधिकाऱ्यांचे हप्ते चालूच

■ नरेन्द्र देशमुख, वर्धा, दि. २८ :









वर्धा-यवतमाळ - नांदेड नवनिर्मित रेल्वे विकास प्रकल्पाच्या खोदकामातील गौण खनिज खुल्या बाजारात खुलेआम विक्री केल्या जात असून दर दिवशी करोडो रुपयांचा शासनाचा महसूल बुडवून लाखो रुपयांची कमाई महसूल विभागातील भ्रष्ट अधिका?यांच्या संगनमताने रेल्वे कंत्राटदार ,उपकंत्राटदार करीत असल्याची तक्रार अमोल कोमावार (व्हिसल ब्लोअर ) यांनी जिल्हाधिकारी यवतमाळ व वर्धा यांचेकडे केली आहे.

नवीन रेल्वे विकासकामाचे कंत्राट वर्धा ते यवतमाळ पर्यंत पीआयएल आरबीआर हर्षिता (जेव्ही)यांना कंत्राट दिलेले होते. परंतु यांच्या कामातील अनियमिततेमुळे रेल्वे निर्माण कार्यालय, देवळी नाका,वर्धा व संबंधित जिल्हाधिकारी येथे सतत तक्रारी व पाठपुराव्यासह आंदोलने करण्यात आली.

रेल्वे विभागाच्या विकसीत कामाकरिता मोठ्या प्रमाणात गौण खनिज उत्खन्न होत असुन यात करोडो रुपयाचा भ्रष्टाचार होत असल्याचे दृष्टिपथ्यास पडल्यामुळे अमोल कोमावार ( व्हिसल ब्लोअर ) यांनी उच्च न्यायालय मुंबईचे खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका दाखल केली आहे. त्यासंदर्भात प्रकरण उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याचे अमोल कोमावार यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

याच प्रकारामुळे पुढील काम केंद्रीय रेल्वे विभागाकडून विकासकामे रेल्वे विकास निगम लिमिटेड यांच्याकरवी केल्या जात असून रेल्वे कंत्राटदारामार्फत अर्थवर्क आणि ब्रिज वर्क असे वेगवेगळे करून हे काम सध्या यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस, महागाव, उमरखेड व पुसद तालुक्यात वेगवान गतीने चालू आहे.

परंतु या रेल्वे विकास कामाच्या उत्खननातील गौण खनिज रेल्वे कंत्राटदार, उपकंत्राटदार महसूल वतुर्ळातील काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या संगनमताने खुल्या बाजारात खुल्या विकत असून यातून दर दिवशी शासनाचा करोडो रुपयाचा महसूल बुडविला जात आहे व लाखो रुपयाची कमाई केल्या जात आहे.

रेल्वे विभागाकडे जर तक्रार केली तर रेल्वे विभागाकडे उपकंत्राटदार याचा कुठल्याही डाटा नसून राज्य शासनाच्या महसूल विभागाकडे रेल्वे कंत्राटदाराचा डाटा उपलब्ध नाही आणि याच गोष्टीचा पुरेपूर फायदा घेऊन बिनधास्त होऊन हा सर्व गैरप्रकार चाललेला आहे.

वरिष्ठ स्तरावरून ई.टी.एस. मोजणी समिती गठित करून तात्काळ संपूर्ण ई.टी.एस. मोजणी केल्यास यातील बराचसा गैरप्रकार बाहेर येऊ शकतो त्याचबरोबर रेल्वे विभागातून निघालेले बिले व प्रत्यक्ष काम व राज्य शासनाकडे भरलेली रॉयल्टी याची पडताळणी केल्यास गौण खनिजाची चोरी तात्काळ पकडल्या जाऊ शकते. परंतु यामध्ये महसूल विभागाचे काही भ्रष्ट कर्मचारी सहभागी असल्याने यातील तक्रारदार अमोल कोमावार (व्हीसल ब्लोअर) यांनी केलेल्या तक्रारीनुसार व त्यामध्ये इ टी एस मोजणीच्या मागणीमुळे महसूल वतुर्ळात खळबळ निर्माण झाली आहे.

सध्या अनेक विकासाची कामे दिग्रस, महागाव, उमरखेड व पुसद या तालुक्यातून चालू असून यातील भ्रष्टाचाराची मोठी रक्कम वरिष्ठ स्तरावरील अधिकाऱ्यांकडे जात असल्याची सुद्धा रंगत आहे.

नैसर्गिक संपत्ती खुलेआम नष्ट केल्या जात आहे. त्याचबरोबर विकासकामे ही निकृष्ट दर्जाची केली जात असून कंत्राटमध्ये दिलेल्या करारनाम्यानुसार कोणतेच विकास काम चालू नसून त्याबाबतची सखोल व पारदर्शक चौकशी करण्याची मागणी होत आहे.

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून तात्काळ इटीएस मोजणीचे आदेश द्यावे याकरिता तक्रारदार अमोल कोमावार (व्हिसल ब्लोअर) यांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना सतत तक्रारी व पाठपुरावा करण्याचा सपाटा लावलेला आहे. प्रकरणाचा तपास केल्यास मोठा घोटाळा समोर येवू शकेल.

## काँग्रेस पक्षात संघटनात्मक फेरबदल



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :
काँग्रेस पक्षाला नवी ऊर्जा आणि बळ देण्यासाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी संघटनात्मक फेरबदलाची प्रक्रिया सुरु केली आहे. या प्रक्रियेचा भाग म्हणून आज काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांची जिल्हानिहाय निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या अहवालानंतर संघटनेत बदल करण्यात येणार आहेत.

फेरबदलाच्या या प्रक्रियेत मंडल स्तरापासून प्रदेश पातळीपर्यंत काँग्रेस संघटना मजबूत करण्यासाठी आवश्यक ते बदल केले जाणार आहेत. रिक्त पदावर नियुक्त्या करण्यात येणार आहेत. तसेच जिथे आवश्यक आहे तिथे नवीन चेहऱ्यांना जबाबदारी दिली जाणार आहे. या संदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या निरीक्षकांची बैठक आज प्रदेश काँग्रेसचे मुख्यालय टिळक भवन येथे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी. एम. संदीप, कुणाल चौधरी, प्रफुल्ल गुडदे पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष कुणाल पाटील, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील, मोहन जोशी उपस्थित होते. या बैठकीत प्रांताध्यक्षांनी निरीक्षकांना यासंदर्भात सूचना केल्या.

हे सर्व निरीक्षक त्यांना नेमून दिलेल्या जिल्ह्यात जाऊन काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधून १५ दिवसांत प्रदेश काँग्रेसला आपला अहवाल सादर करणार आहेत. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर संघटनात्मक फेरबदलांच्या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.

दरवर्षी दोन कोटी बेरोजगारांना नोकरी देणार त्याचे काय झाले? शेतकऱ्यांच्या शेतमालाला दीडपट भाव देणार त्याचे काय झाले? काळा पैसा विदेशातून आणणार त्याचे काय झाले? असे अनेक प्रश्न हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित केले.

# राष्ट्रवादीचा संभाजी भिडेंवर घणाघात

**आंब्याचा सिझन**

**आल्याने भिडे बरळतोय, अमोल मिटकरींची टीका; अजित पवारांनीही घेतला समाचार**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २८ :** छत्रपती शिवाजी महाराज सर्वधर्मीय नव्हते असा वादग्रस्त दावा करणाऱ्या संभाजी भिडे यांच्यावर सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसने टीकेची झोड उठवली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विश्वासू अमोल मिटकरी यांनी या प्रकरणी भिडेंवर निशाणा साधत आंब्याचा सिझन आल्यामुळे ते असे बरळत असल्याची टीका केली आहे. स्वतः अजित पवारांनीही शिवरायांच्या स्वराज्यात सर्वच जाती धर्माच्या लोकांना स्थान होते असे नमूद करत भिडे यांचा दावा खोडून काढला आहे.



अमोल मिटकरी यासंबंधी अकोल्यात बोलताना म्हणाले की, सध्या आंब्याचा सिझन आला आहे. त्यामुळे संभाजी भिडे बेताल बरळत आहेत. त्यांनी बहुजन समाजातील पोरांना हाताशी धरून इतिहासाची मोडतोड करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी शिवाजी महाराजांवर आक्षेपार्ह विधान करणाऱ्या प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर व विकृत इतिहास लिहिणाऱ्या राम गणेश गडकरी यांच्यावर बोलावे. ते यांच्यावर का बोलत नाहीत? अमोल मिटकरी यांनी यावेळी आता संभाजी भिडे यांची व्हॅलिडीटी संपल्याचा टोलाही हाणला.

**अजित पवारांनीही दावा खोडला**

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही संभाजी भिडे यांचा दावा खोडून काढला आहे. संभाजी भिडे त्यांना वाटेल ते बोलू शकतात. पण छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्यात सर्वच जाती धर्माचे लोक सुखाने नांदत होते.

शिवाजी महाराज एक आदर्श राजे होते. रयतेचे राजे होते. सर्वांनीच राजा म्हणून त्यांचे नेतृत्व स्वीकारले होते, असे ते कोल्हापुरात बोलताना म्हणाले.

सरकारमध्ये असो वा विरोधी पक्षात, राजकीय नेत्यांनी आपल्या विधानातून सामाजिक तेढ निर्माण होऊ नये, याची काळजी घेतली पाहिजे. महाराष्ट्रात मोठ्या संख्येने मुस्लिम राहतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीत देखील अनेक मुस्लिमांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. मात्र, अशा प्रकारच्या दिशाभूल करणाऱ्या विधानांच्या मागचा हेतू मला समजला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी कधीही जाती किंवा पंथाच्या आधारावर कुणाशी भेदभाव केला नाही. हा इतिहास आहे आणि तो सर्वमान्य आहे, असेही अजित पवार यावेळी ठणकावून म्हणाले.

**आता पाहू काय म्हणाले होते संभाजी भिडे?**

शिवप्रतिष्ठाने हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी रायगडावरील वाघ्या कुत्र्याच्या शिल्पाचे समर्थन केले होते. यावेळी बोलताना त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज सर्वधर्मीय नव्हते असा वादग्रस्त दावा केला होता.

छत्रपती शिवाजी महाराज सर्वधर्मीय नव्हते. शिवाजी महाराज व संभाजी महाराजांनी शहाजी राजे यांचा हिंदवी स्वराज्याचा विचार पुढे नेला. पण आपल्याकडील प्राध्यापक, शिक्षक हे चुकीचा इतिहास मांडत आहेत, असे ते म्हणाले होते.

उल्लेखनीय बाब म्हणजे मंत्री नीतेश राणे यांनीही काही दिवसांपूर्वी संभाजी भिडे यांच्यासारखाच एक दावा केला होता.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सैन्यात एकही मुस्लिम सैनिक नव्हता. त्यांची लढाई मुस्लिमांविरोधात होती, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानाचेही राजकीय वर्तुळात तीव्र पडसाद उमटले होते.

## तर आदित्य ठाकरे यांची देखील नार्को टेस्ट करायला पाहिजे; दिशा सालियन प्रकरणात कदमांची मागणी

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २८ :** शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेतली, या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना त्यांनी महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. नुकतंच अर्थसंकल्पीय अधिवेशन पार पडलं, यावरून त्यांनी निशाणा साधला, हे अर्थसंकल्पीय अधिवेश निरर्थक असल्याचं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं. तसेच यावेळी बोलताना त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर देखील हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे यांच्या या टीकेनंतर आता शिवसेनेचे नेते चांगलेच आक्रमक झाले आहेत. उदय सामंत आणि शंभूराज देसाई यांच्यानंतर रामदास कदम यांनी देखील उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.



**नेमकं काय म्हणाले कदम?**

उध्दव ठाकरे आता वेडे होऊन दगडं मारायचे बाकी आहेत. उध्दव ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या सोबत असणाऱ्या सर्व नेत्यांना संपवण्याचं पाप केलं आहे. त्यांना त्याची शिक्षा भोगावीच लागणार आहे. खरी शिवसेना आमचीच आहे, असं कदम यांनी म्हटलं आहे.

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी दिशा सालियन प्रकरणावरून देखील निशाणा साधला आहे. मुलाला वाचवण्यासाठी पुरावे नष्ट केले आहेत का? याची चौकशी होणे गरजेचं आहे. किशोरी पेडणेकर नेहमी दिशा सालियन प्रकरणात घरी का जायच्या? याचाही तपास होणे गरजेचे आहे.

दिशा सालियनच्या वडिलांची नार्को टेस्ट करा अशी मागणी होत असेल तर आदित्य ठाकरेंची देखील नार्को टेस्ट व्हायला हवी, अशी मागणी या प्रकरणात कदम यांनी केली आहे.

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी संतोष देशमुख प्रकरणावर देखील प्रतिक्रिया दिली आहे. वाल्मीक कराड याच्या सहकाऱ्यांनी हत्येची कबुली दिली आहे, त्यामुळे आता त्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे, बीड जिल्ह्यात २०० हून अधिक रिव्हॉल्व्हरचे परवाने देण्यात आले, परवाने देण्यासाठी कोणाच्या शिफारशी होत्या याचीही चौकशी व्हायला हवी.

या प्रकरणात धनजंय मुंडे आणि वाल्मीक कराड यांचा किती सहभाग आहे याचीही चौकशी व्हायला हवी, अशी मागणी कदम यांनी केली आहे.

## नुसते विधान भवनात येतात अन,

### ठाकरेंच्या आरोपांना सामंतांचं खोचक प्रत्युत्तर



**मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन राज्यातील महायुती सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. नुकतंच राज्याचं अर्थसंकल्पीय अधिवेशन पार पडलं या अधिवेशनावरून त्यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. अर्थसंकल्पीय अधिवेशन निरर्थक होतं. अपयश लपवणारं अधिवेशन होतं, असा हल्लाबोल उद्धव ठाकरे यांनी केला आहे. दरम्यान त्यानंतर आता मंत्री उदय सामंत यांनी उद्धव ठाकरे यांच्या आरोपांना जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे.

**नेमकं काय म्हणाले उदय सामंत?**

उद्धव ठाकरे यांनी एक पत्रकार परिषद घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली, त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यामध्ये विस्तव टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांची दोस्ती पक्की आहे. उद्धव ठाकरे बालिशपणा करत आहेत, शिवसेना खरी कोणाची? हे न्यायालयाने आधीच सिद्ध केलं आहे. आम्ही ८० जागा लढलो ६० जागा जिंकलो, ते फक्त २० जागाच जिंकले, त्यांच्या हातात आता काही राहिलं नाही, ते काँग्रेसच्या तालावर नाचत आहेत, असा हल्लाबोल सामंत यांनी यावेळी केला आहे

दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, काँग्रेसबरोबर जाऊन त्यांनी बाळासाहेब यांच्यासोबत गद्दारी केली. सौगात हा मोदींचा उपक्रम आहे. यांनी फेक नरेटीव्ही सेट केला आहे. आम्ही पाकिस्तानचं समर्थन करत नाही, यांनी कंगनाच्या घरावर कारवाईसाठी बुलडोझर पाठवला. राणे साहेबांना अटक करण्यासाठी पोलीस पाठवले. यांनी जे कृत्य केले ते पुसले जाणार नाहीत असं सामंत यांनी म्हटलं आहे. अधिवेशनामध्ये प्रत्येक घोषणेवर चर्चा झाली आहे. आम्ही आमचा अजेंडा पाच वर्षांमध्ये पूर्ण करणार आहोत. यांना जे जमले नाही ते आम्ही केले आहे. गिरीश महाजन यांना एका प्रकरणात यांनी अटकवण्याचा प्रयत्न केला. नुसती विधान भवनात येऊन पत्रकार परिषद घेतात. यांनी आधी काम पूर्णपणे समजून घेणं गरजेचं आहे, असंही यावेळी उदय सामंत यांनी म्हटलं आहे.

## राज्यातील ६४ लाख शेतकजयांना मोठा दिलासा!

### कोटी विमा नुकसान भरपाई मिळणार

**मुंबई :** राज्यातील लाख शेतकजयांना मोठा दिलासा देणारा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. या निर्णयानुसार, त्यांच्या बँक खात्यात थेट ?२५५५ कोटी विमा नुकसान भरपाई जमा होणार आहे. शासनाने विमा कंपन्यांना देय असलेला प्रलंबित राज्य हिस्सा अनुदान म्हणून २८५२ कोटी वितरित करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे मागील काही हंगामांतील प्रलंबित विमा नुकसान भरपाई शेतक ?यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा केली जाणार आहे. या प्रक्रियेस गती देण्यासाठी विमा कंपन्यांना तातडीने ही रक्कम शेतक ?यांच्या खात्यावर जमा करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे शेतक ?यांना प्रत्यक्ष लाभ मिळणार असल्याचे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

**खरीप २०२२ आणि रब्बी२०२२२३२.८७ कोटी**
**खरीप २०२३ -९८१ कोटी**
**रब्बी २०२३२४-६३.१४. कोटी**
**खरीप २०२४२३०८ -कोटी**

शासनाने विमा कंपन्यांना निधी वितरित केला असून, ही नुकसान भरपाई शेतकजयांच्या खात्यावर तातडीने जमा केली जाईल. यामुळे शेतकजयांना आर्थिक स्थैर्य मिळेल आणि त्यांना शेतीसाठी नवीन आर्थिक आधार निर्माण होईल. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतक ?यांना मोठा दिलासा मिळणार असून, शासनाच्या या पावलामुळे शेती क्षेत्राला बळकटी मिळेल, असे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी स्पष्ट केले.

## नाशिकच्या त्र्यंबकेश्वर देवस्थानाला वर्ग 'अ' दर्जा जाहीर

**नाशिक :** येथील त्र्यंबकेश्वर मंदिराला 'अ' वर्गाचा दर्जा देण्यात आला आहे. आगामी काळात होणाऱ्या कुंभमेळाच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर देवस्थानाला वर्ग 'अ' दर्जा जाहीर करण्यात आला. राज्याच्या नगरविकास खात्याने या निर्णयाला मंजुरी दिली. विभागीय आयुक्तांकडून या संबंधीचा प्रस्ताव पाठवण्यात आला होता. आगामी कुंभमेळा आणि बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असल्याने 'अ' दर्जा मंदिर घोषित करण्यात आले आहे.

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक म्हणून, त्र्यंबकेश्वर मंदिर हे अत्यंत पवित्र शिव मंदिर मानले जाते. मंदिराच्या स्थापत्यकलेवर हेमाडपंथी शैलीचा प्रभाव आहे, जी त्याच्या गुंतागुंतीच्या दगडी कोरीव कामासाठी ओळखली जाते. मंदिराला 'अ' वर्गाचे मंदिर म्हणून घोषित करणे त्याच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्वामुळे देखील महत्त्वाचे आहे. या काळता राज्य सरकारने सुधारित रस्ते, वाहतूक व्यवस्था आणि निवास पर्यायांसह विविध पायाभूत सुविधांच्या विकासाची योजना आखली आहे.

**मंदिराची काही प्रमुख वैशिष्ट्ये अशी आहेत**

**तीन लिंगे:** मंदिरात ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांचे प्रतिनिधित्व करणारे तीन लिंगे आहेत.कुशावर्त कुंड: मंदिर संकुलातील एक पवित्र तलाव, जो गोदावरी नदीचा उगम मानला जातो. गोदावरी नदी: ही नदी त्र्यंबकजवळून उगम पावते आणि भारतातील सर्वात लांब नद्यांपैकी एक आहे. नाशिकमध्ये येणारा कुंभमेळा १४ जुलै ते २५ सप्टेंबर २०२७ या कालावधीत होणार आहे. हा महत्त्वाचा धार्मिक कार्यक्रम दर १२ वर्षांनी येतो आणि लाखो भाविक, साधू आणि यात्रेकरूंना आकर्षित करतो. जे पवित्र गोदावरी नदीत पवित्र स्नान करण्यासाठी एकत्र येतात.

# दिशा सालियन वडिलांच्या अफेअरमुळे होती त्रस्त

**मित्रांशी केली होती चर्चा; आर्थिक तणावातून आयुष्य संपवल्याचा क्लोजर रिपोर्टमध्ये दावा**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २८ :** बॉलिवूड अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची माजी मॅनेजर दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणात एक नवा खुलासा झाला आहे. त्यानुसार, दिशा आपल्या वडिलांच्या अफेअरमुळे परेशान झाली होती. संबंधितांना पैसे देऊन ती पुरती थकली होती. यामुळे आलेल्या आर्थिक वैफल्यातून तिने स्वतःचे आयुष्य संपवून घेतले, असे मालवणी पोलिसांच्या यापूर्वीच्या क्लोजर रिपोर्टमध्ये नमूद करण्यात आले आहे. दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणी सध्या राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपाच्याजोरदार फैरी झडत आहेत. त्यातच आता मालवणी पोलिसांनी यापूर्वी दाखल केलेल्या आपल्या क्लोजर रिपोर्टमध्ये वरील नवी माहिती उजेडात आली आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, दिशा सालियान वडिलांच्या अफेअरमुळे संबंधितांना पैसे देऊन थकली होती. कष्टाने कमावलेला पैसा नको त्या गोष्टींवर खर्च होत असल्यामुळे ती खचली होती. तिने आपल्या मित्रांशीही ही गोष्ट बोलून दाखवली होती. याच आर्थिक तणावातून नंतर तिने आत्महत्या केली. यापूर्वी झालेल्या शवविच्छेदन अहवालात दिशावर कोणत्याही प्रकारचा अत्याचार झाला नसल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. या अहवालात डोक्याला गंभीर इजा झाल्यामुळे तिचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला होता.



**मालवणी पोलिसांच्या रिपोर्टमध्ये नेमके काय?**

दिशा सालियनने ८ जून २०२० रोजी आत्महत्या केली होती. या घटनेनंतर मालवणी पोलिसांनी तपास करुन एक अहवाल सादर केला होता.

त्यात दिशाचे काही प्रोजेक्ट्स अयशस्वी झाले होते, मित्रांशी खटके उडाले होते, अशा कारणांचा उल्लेख होता. याशिवाय महत्त्वाचे म्हणजे दिशाच्या वडिलांनीच लेकीने कष्टाने कमावलेले पैसे आपल्या ऑफिसमधील महिला कर्मचाऱ्यावर उधळल्याचेही यात नमूद आहे. दिशाने ही गोष्ट तिच्या काही मैत्रिणींना आणि तिच्या होणाऱ्या नवऱ्यालाही सांगितली होती. २ जून २०२० रोजी दिशाने यासंबंधी आपल्या वडिलांना जाब विचारला आणि त्यानंतर ती तिचा होणारा नवरा रोहन रॉय याच्या जनकल्याण नगरमधील फ्लॅटवर राहायला गेली.

दिशाच्या मृत्यूनंतर पोलिसांनी पुरावे गोळा केले आणि साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यानंतर त्यांनी दिशाने आत्महत्या केल्याचा अंतिम निष्कर्ष काढला. ४ फेब्रुवारी २०२१ रोजी हा क्लोजर रिपोर्ट सादर करण्यात आला. सतीश सालियन यांनी आता पुन्हा याचिका दाखल करून काही बड्या असामींवर आरोप केले आहेत. त्यामुळे हे प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

**मृत्यूनंतर ३ दिवसांनी झाले होते शवविच्छेदन**

उल्लेखनीय बाब म्हणजे दिशा सालियनचा मृत्यू ८ जून २०२० रोजी झाला होता. त्यानंतर ३ दिवसांनी तिचे शवविच्छेदन झाले होते. त्यात दिशाच्या हात, पाय व छातीवर जखमा झाल्याचा उल्लेख आहे. विशेषतः तिच्या डोक्याला गंभीर जखम झाल्यामुळे तिचा मृत्यू झाल्याचे या रिपोर्टमध्ये नमूद आहे. एवढेच नाही तर दिशाच्या नाक व तोंडातून रक्त येत असल्याचेही या रिपोर्टमध्ये अधोरेखित करण्यात आले आहे. पण तिच्यावर कोणताही लैंगिक अत्याचार किंवा बलात्कार झाल्याची नोंद त्यामध्ये नाही.

**दिशाच्या वडिलांनी मुंबई सीपींची घेतली होती भेट**

दुसरीकडे, दिशा सालियनच्या वडिलांनी आपल्या वकिलांसह नुकतीच मुंबईच्या अतिरिक्त पोलिस आयुक्तांची भेट घेऊन आपल्या मुलीच्या कथित हत्येची सखोल चौकशी करण्याची मागणी केली.

या प्रकरणी त्यांनी आदित्य ठाकरे यांच्या भूमिकेची चौकशी करण्याची मागणी करत या प्रकरणात उद्धव ठाकरे यांनाही सहआरोपी केले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आदित्य ठाकरे यांना वाचवण्यासाठी आपल्या पदाचा गैरवापर केला, असा त्यांचा आरोप आहे.

एवढेच नाही तर आदित्य ठाकरे यांचा ड्रगजच्या व्यापारात हात असल्याचा दावाही त्यांनी केला आहे. या आरोपांमुळे राज्याचे राजकारण अधिकच तापण्याची चिन्हे आहेत.

# दिशाच्या वडिलांनी मुलीच्या मृत्यूआडून राजकारण करू नये

**संजय राऊत यांची टीका**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २८ :** बॉलिवूड अभिनेता सुशांत सिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणावरून ठाकरे गटाचे शिवसेना खासदार संजय राऊत यांनी मोठा आरोप केला आहे. दिशाच्या वडिलांनी मुलीच्या मृत्यूचा वापर करून राजकारण करू नये, अशी टीका त्यांनी केली. दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणी गेल्या काही दिवसांपासून राजकीय वातावरण तापले आहे. आता या प्रकरणात मालवणी पोलिसांनी दिलेल्या क्लोजर रिपोर्टमधून धक्कादायक खुलासे समोर आले आहेत. या अहवालानुसार, दिशाच्या आत्महत्येमागे कौटुंबिक कारणे आणि आर्थिक विवंचना जबाबदार होती. या पार्श्वभूमीवर संजय



राऊत म्हणाले, काल पोस्टमार्टमचा रिपोर्ट आला असून, आमच्यासाठी हा विषय संपला आहे. आपल्या मुलीच्या मृत्यूचा आधार घेत राजकारण करू नका. शवविच्छेदन अहवालातून सत्य समोर आले आहे. ते पुढे म्हणाले, त्या मुलीला डिप्रेशन होतं, हे तिच्या कुटुंबाचा आणि वैयक्तिक आयुष्याचा भाग आहे. आम्हाला त्यावर राजकारण करायचे नाही. मात्र, आता पाच वर्षांनी तिच्या वडिलांना हाताशी धरून काही लोक राजकारण करत आहेत, त्यांना लखलाभ होवो! संजय राऊत यांनी शिवसेना शिंदे गटावरही जोरदार हल्ला चढवला. त्यांनी म्हटले, आम्ही कुठल्याही गोष्टीला तोंड देण्यासाठी समर्थ आहोत.

मात्र, या प्रकरणाचा वापर करून काही लोक महाराष्ट्राच्या पहिल्या क्रमांकाच्या ठाकरे कुटुंबावर चिखलफेक करू इच्छित आहेत. बाळासाहेब ठाकरेंचे फोटो लावून स्वत:ला त्यांचे विचार वाहक म्हणणाजयांनी लाज बाळगली पाहिजे. दिशा सालियनच्या मृत्यू प्रकरणावरून आता राजकीय आरोप-प्रत्यासे वाढले असून, शिंदे गट आणि ठाकरे गटामध्ये नवीन संघर्ष निर्माण झाला आहे.

संजय राऊत यांच्या या वक्तव्यावर शिंदे गटाकडून काय प्रत्युत्तर दिले जाते, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

## भुजबळ-मुंडेसमित्यांबाहेर, अजित पवारांचा डाव?

**राष्ट्रवादीत अंतर्गत धक्का!**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २८ :** महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा राजकीय उलटफेर घडला असून, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मधील दोन दिग्गज नेते छगन भुजबळ आणि धनंजय मुंडे यांना विधिमंडळाच्या समित्यांमध्ये स्थान न मिळाल्याने राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे. अजित पवारांनी आपल्या पक्षातील या दोन वरिष्ठ नेत्यांना डावलल्याने अनेक तर्कवितर्कांना उधाण आले असून, हा पक्षांतर्गत बदलाच्या दिशेने मोठा संकेत मानला जात आहे.राष्ट्रवादीच्या कोअर कमिटीतील महत्त्वाचे नेते असलेल्या भुजबळ आणि धनंजय मुंडे यांना यावेळी विधिमंडळाच्या कोणत्याही समितीत स्थान देण्यात आले नाही. हा निर्णय पक्षाच्या अंतर्गत रणनीतीचा भाग असल्याचे बोलले जात आहे. भुजबळ मागील काही काळापासून पक्षात नाराजी व्यक्त करत होते, तर मुंडेंवर भ्रष्टाचाराचे आरोप आणि वादग्रस्त प्रकरणांमुळे पक्षावर टीका होत होती. या पार्श्वभूमीवर, या दोघांना समित्यांमधून बाजूला ठेवण्याचा निर्णय हा पक्षाच्या प्रतिमेला डाग लागू नये, या दृष्टीने घेतला असावा, अशी शक्यता राजकीय तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. विधिमंडळाच्या विविध समित्यांमध्ये पक्षाच्या इतर आमदारांना संधी देण्यात आली असून, अनेकांनी प्रमुख पदेही मिळवली आहेत. मात्र, भुजबळ आणि मुंडे यांना संधी न देणे, हा पक्षांतर्गत बदलाचा स्पष्ट संकेत मानला जात आहे. पक्षातील गटबाजी, आगामी निवडणुकींच्या रणनीती आणि स्वच्छ प्रतिमेचा आग्रह या निर्णयामागे असू शकतो. या निर्णयामुळे विरोधकांना राष्ट्रवादीवर टीका करण्याची संधी मिळाली आहे. भुजबळ आणि मुंडे यांना वगळण्यामागे नेमका हेतू काय, हे अजून स्पष्ट झालेले नाही.

# सौगातएमोदी वरून प्रकाश आंबेडकरांचा निशाणा

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नागपूर, दि. २५ :** भाजपने सौगत-ए-मोदीमोहीम सुरू केली आहे. याअंतर्गत, देशभरातील लाख वंचित मुस्लिमांना ईद साजरी करण्यासाठी विशेष किट दिली जात आहेत. भाजपच्या अल्पसंख्याक आघाडीने या मोहिमेची जबाबदारी घेतली आहे. देशातील हजार मशिदींसह भाजपच्या अल्पसंख्याक आघाडीचे हजार कार्यकर्ते गरजूंना हे किट पोहोचवतील. यासाठी प्रत्येक मशिदीतील लोकांना मदत करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. यावर आता वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी टीका केली आहे. रक्तात माखलेले 'सौगात-ए-मोदीशा प्रकारे आंबेडकर यांनी या किटचे वर्णन केले आहे. या संदर्भात प्रकाश आंबेडकर म्हणाले की, 'सौ चूहे खाकर बिल्ली हज को चली' या वाक्याचा प्रत्यय येत आहे. मोदी लाख मुस्लिम बांधवांना या रमजानच्या शुभेच्छा देत आहेत. मात्र मुस्लिमांनो, जागे व्हा आणि मित्र आणि शत्रू मधील फरक ओळखा, असे आवाहन देखील आंबेडकर यांनी केले आहे. प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, जे हात मुस्लिमांच्या रक्ताने भिजलेले आहेत -गुजरातपासून ते मॉब लिंचिंगमध्ये मरण पावलेल्या प्रत्येक मुस्लिमापर्यंत... आज मुस्लिमांना खजूर आणि शेवया देऊन त्यांना आकर्षित करायचे आहे. तबरेज अन्सारी, मोहम्मद अखलाक, जुनैद खान, अलिमुद्दीन अन्सारी, पेहलू खान, मोहसीन शेख, मोहम्मद कासिम, सिराज खान, जैनुल अन्सारी, रकबर खान आणि त्यांच्या द्वेषाला बळी पडलेल्या नावांना मुस्लिम विसरले आहेत का? च्या दंगलीत बिल्किस बानोच्या ओरडण्याकडे दुर्लक्ष करून एखादा मुस्लिम सलवार-कमीज आणि कुर्ता-पायजमा घालेल का? प्रेषितांच्या आदरापोटी मुस्लिम मूर्खपणाकडे दुर्लक्ष करून ड्रायफ्रूट्स खातील का? अलीकडे वक्फ तरमीम विधेयकाच्या माध्यमातून मुस्लिमांच्या भूमीला लक्ष्य केले जात आहे. देशभरात बुलडोझरद्वारे मुस्लिमांची अस्मिता पायदळी तुडवली जात आहे. सर्व परिस्थिती असतानाही मुस्लीम कोणत्या तोंडाने मोदींची भेट स्वीकारण्यास तयार आहे? मुस्लिमांच्या प्रत्येक प्रश्नात आणि प्रत्येक दु:खात त्यांच्या पाठीशी उभे राहणारे, त्यांच्याकडे दुर्लक्ष करून पवित्र धाग्यासाठी मते मागणारे मौलवी आज गप्प का आहेत? असे प्रश्न ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी उपस्थित केले आहेत.



## लोकलेखा समितीच्या अध्यक्षपदावरून शरद पवार गट नाराज

**महाविकास आघाडीत तणाव!**

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणात महाविकास आघाडी अंतर्गत पुन्हा एकदा तणाव निर्माण झाला आहे. लोकलेखा समितीच्या अध्यक्षपदावरून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्यात मतभेद उफाळले आहेत. काँग्रेसने हे पद आपल्या गटनेते विजय वडेट्टीवार यांना दिल्याने शरद पवार गटाच्या आमदारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. या निर्णयामुळे शरद पवार गटाला दुर्लक्षित केल्याची भावना निर्माण झाली असून, आघाडीत अंतर्गत अस्वस्थता वाढली आहे. लोकलेखा समिती हे विधिमंडळातील एक महत्त्वाचे पद मानले जाते. ही समिती सरकारच्या आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवण्याचे काम करते. अशा परिस्थितीत, काँग्रेसने हे पद स्वत:कडे ठेवण्याचा निर्णय घेतल्याने राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नाराज झाला आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, शरद पवार गटातील काही आमदारांनी पक्षश्रेष्ठींकडे तक्रार नोंदवली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, महाविकास आघाडीत सर्व घटक पक्षांना समान सन्मान आणि संधी मिळायला हवी, परंतु काँग्रेसच्या या निर्णयाने असंतोष निर्माण झाला आहे. या वादावर तोडगा काढण्यासाठी शरद पवार यांनी पुढाकार घेतला आहे. त्यांनी आपल्या आमदारांना आश्वासन दिले आहे की, महाविकास आघाडीच्या पुढील बैठकीत हा विषय उपस्थित करून योग्य निर्णय घेतला जाईल. शरद पवार यांच्या या भूमिकेमुळे आघाडीत तणाव निवळण्याची शक्यता आहे. मात्र, काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार गट) यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

**आघाडीच्या एकजुटीवर प्रश्नचिन्ह?**

या घडामोडीमुळे महाविकास आघाडीच्या एकजुटीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) नाराजीमुळे आघाडीतील अंतर्गत मतभेद उघड झाले आहेत, जे आगामी राजकीय समीकरणांवर परिणाम करू शकतात.

# बोगस ४९ शिक्षकांना ५० हजार पगार

**नाशिकच्या लेखाधिकाऱ्यावर गुन्हा**

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नाशिक, दि. २८ :** जळगाव जिल्ह्यात शिक्षण संस्थांत शिक्षकांची बोगस भरती करत तेथील ४४ शिक्षकांना शालार्थ आयडी देण्यात आले. तसेच दरमहा हजार रुपये वेतन शासन तिजोरीतून देण्यात आले. याप्रकरणी दीड लाख रुपये वेतन असलेल्या नाशिक शिक्षण उपसंचालक कार्यालयातील लेखाधिकारी उदय पंचभाई व जळगाव माध्यमिक वेतन पथकाचा अधीक्षक राजमोहन शर्मा यांच्यावर गुरुवारी नाशिकरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दिव्य मराठीने मार्चच्या अंकात बातमी प्रकाशित करून हे प्रकरण उघडकीस आणले होते. पदाधिकारी, मुख्याध्यापक यांच्यासोबत संगनमत करून ही फसवणूक करण्यात आल्याचे प्राथमिक तक्रारीत म्हटले आहे. रामकृष्ण अभिमन पाटील यांनी शिक्षण आयुक्तांकडे या बोगस शिक्षकांबाबत तक्रार केली होती. त्यानंतर आयुक्तांनी शिक्षण उपसंचालक भाऊसाहेब चव्हाण यांना प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सांगितले होते.

**अधिकाऱ्यांनी पुरावे न तपासता शालार्थ आयडी कोड दिला**

शालार्थ आयडी कोडसाठी वित्त अधिकाऱ्यांनी पुरावे न तपासता तो दिला. वेतन पथक अधिकाऱ्यानेही काहीही न बघता पगार सुरू केला. म्हणून दोन्ही अधिकाऱ्यांवर आरोप निश्चित करून तक्रार दिली. सध्या अंदाजे ४४ जणांचे कोड जनरेट केल्याचे प्राथमिकरीत्या समोर आले आहे, पण ही संख्या निश्चित नाही. ती वाढू शकेल.

**– भाऊसाहेब चव्हाण, विभागीय शिक्षण उपसंचालक नाशिक**

**वरिष्ठ स्तरावर चौकशी**

या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर चौकशी झालेली होती. प्रकरणात माध्यमिक शिक्षण विभागाकडे कोणताही पत्रव्यवहार किंवा माहिती आलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाबाबत काहीही सांगता येणार नाही असे शिक्षणाधिकाऱ्यांनी सांगितले होते.

या संस्थांत दिले बोगस शालार्थ आयडी, भगिनी मंडळ शिक्षण संस्था, अमळनेर., शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, अमळनेर.,

महात्मा फुले शिक्षण संस्था, टाकरखेडा, अमळनेर

ग्रामीण विकास विद्या प्रसारक मंडळ, एरंडोल., र. चि. पाटील बहू शिक्षण संस्था, वावडे, अमळनेर., शिवाजी शिक्षण संस्था, कासोदा, अमळनेर., सर्वोदय शिक्षण संस्था, सिंधगव्हाण., बेलगंगा शिक्षण संस्था, बेलगंगानगर., नूतन मराठा शिक्षण संस्था, जळगाव.,प. पू. माधव सदाशिव गोळवलकर गुरुजी सार्वजनिक संस्था, कुऱ्हा काकोडा, मुक्ताईनगर

## समीक्षा पंडीतचे वक्तृत्व स्पर्धेत सुयश

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. २८ मार्च :** येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील समीक्षा पंडीतने गोंडवाना विद्यापीठस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटाकावला असून सदर स्पर्धा यादवराव पोशट्टीवार महाविद्यालय, तळोधी (बा.) येथे 'आजचा युवक व समाजमाध्यमांचा प्रभाव' या विषयावर नुकतीच पार पडली. सदर स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ अमृत लंजेंनी केले. यावेळी अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ पी अरुण प्रकाश तर परिक्षक म्हणून डॉ धनराज खानोरकर, डॉ विकास मोहतुरे, संतोष नन्नावार उपस्थित होते व संयोजक डॉ संजय चव्हाण, प्रा उपेंद्र चिटमलवार उपस्थित होते.

## मंत्री संजय राठोड जिल्हा दौऱ्यावर

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ मार्च :** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड हे २९ मार्च २०२५ रोजी चंद्रपूर जिल्ह्याच्या दौ-यावर येत आहेत. २९ मार्च रोजी सकाळी ११.४५ वाजता पाटण, ता. जिवती येथे आगमन व शासकीय आश्रमशाळा येथे आयोजित जगदगुरू सेवालाल महाराज जिल्हास्तरीय जयंती व भव्य सत्कार सोहळ्याला उपस्थिती, दुपारी २.१५ वाजता चंद्रपूर हेलीपॅड येथे आगमन, दुपारी २.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे मृद व जलसंधारण विभागाच्या आढावा बैठकीस उपस्थिती.

# बेंबाळ येथे कोट्यवधीची अवैध दारु पकडली

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. २८ मार्च :** बेंबाळ हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना २७ मार्च रोजी एक फोरव्हीलर गाडीने दारूची अवैध्य वाहतुक होत आहे. अश्या खबरेवरून मौजा नेवगाव भुजला ते बेंबाळ जाणारे विकांत मोहुर्ले यांचे शेताजवळ बेंबाळ रोडवर नाकाबंदी केली असता बेंबाळ कडुन चांदापुर फाटयाकडे एका ग्रे रंगाची सुझुकी इर्टीगा गाडी क्रं. एमएच३४, CD ७११६ येतांना दिसली सदर वाहनास पंचासमक्ष थांबवुन वाहनाची झडती घेतली असता सदर वाहनामध्ये अवैध्य दारू साठा मिळुन आला.



किंमत ५८,५०० रू. ROYAL STAG DELUX WHISKY कंपणीचे ५ पेटी प्रत्येक पेटीमध्ये ६ नग प्रत्येकी २ लिटर विदेशी दारू भरलेले, एकुण ३० नग प्लास्टीक बॉटल्स किंमत प्रत्येकी १९५० रू. प्रमाणे. ज्याचा बॅच नं. ३६७० दि. १८/०२/२५. किंमत ४६,८०० रू. ROYAL STAG DELUX WHISKY कंपणीचे ५ पेटी प्रत्येक पेटीमध्ये १२ नग प्रत्येकी ७५० मीली. विदेशी दारू भरलेले, एकुण ६० नग काचेच्या बॉटल्स किंमत प्रत्येकी ७८० रू. प्रमाणे. ज्याचा बॅच नं. २१०५ दि. ०९/१०/२४. किंमत १.४५,९२० ROYAL STAG DELUX WHISKY कंपणीचे १६ पेटी प्रत्येक पेटीमध्ये ४८ नग प्रत्येकी १८० मीली. विदेशी दारू भरलेले, एकुण ७६८ नग काचेच्या बॉटल्स किंमत प्रत्येकी १९० रू. प्रमाणे, ज्याचा बॅच नं. ३१०५ दि. २४/१२/२४. किंमत ९,६०० रू ROYAL GREEN WHISKY कंपणीचे १ पेटी ज्यामध्ये ४८ नग काचेच्या बॉटल्स प्रत्येकी १८० मीली. विदेशी दारू भरलेले, किंमत प्रत्येकी २०० रू. प्रमाणे. ज्याचा बॅच नं. १९४-१/२५ किंमत ९,१२० रु. Budweiser MAGNUM BEER कंपणीचे २ पेटी ज्यामध्ये ४८ नग टिन कॅन प्रत्येकी ५०० मीली. विदेशी दारू बियर भरलेले, किंमत प्रत्येकी १९० रू. प्रमाणे. ज्याचा बॅच नं. १२७३ दि. ०९/०१/२५ किंमत ९,१२० रू. CarlWerg ELEPHANT STRONG BEER कंपणीचे २ पेटी ज्यामध्ये ४८ नग टिन कॅन प्रत्येकी ५०० मीली. विदेशी दारू बियर भरलेले, किंमत प्रत्येकी १९० रू. प्रमाणे. ज्याचा बॅच नं. १२९४ दि. २०/०२/२५, किंमत १२,४८० रु. HAYWARDS ५००० STRONG BEER कंपणीचे ४ पेटी ज्यामध्ये ९६ नग टिन कॅन प्रत्येकी ५०० मीली. विदेशी दारू बियर भरलेले, किंमत प्रत्येकी १३० रू. प्रमाणे. ज्याचा बॅच नं. ७६६ दि. १३/०२/२५, किंमत १०,००,००० रू. एक ग्रे रंगाची सुझुकी इर्टीगा गाडी क. MH 34 CD ७११६ जिचा इंजिन नं. K15CN९३३९२४६ चेसीस नं. MA3BNC625PJ६८४१७४ असा असलेली. असा एकुण १२,९१,५४० रु.चा मूददेमाल मिळुन आला.

सदर कार्यवाही दरम्यान वाहन चालक यास गुन्हयात अटक करण्यात आली. व ईतर आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा तपास मुल पोलीस करीत आहे.

# माकडाच्या हौदोसाने वन विभागाचे कार्यालय व निवासाचे नुकसान



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**नागभीड, दि. २८ मार्च :** नागभिड तालुक्यात उन्हाची तीव्रता वाढत असल्याने वन्य प्राणी पाण्याच्या शोधात गावाकडे येत असल्याने अनेक ठिकाणी घराची नुकसान करीत असून फुलझाडे व झाडाची नुकसान करीत असल्याचे दिसून येत आहे.

त्यातच मिंडाळ येथील वनपाल यांचे निवास स्थान व कार्यालय नागभिड येथे आहे. वन्य प्राणी माकड यांची टोळी काही काळ शहरात मिळत असलेल्या सोई सुविधा मुळे त्यांनी जंगलात जाण्याऐवजी आपला मुक्काम गावात ठोकत आहे.

यामुळे अनेक कवेलु घरे यांचेवर उडी मारून घराचे नुकसान करीत आहेत तर काही ठिकाणी घरी असलेली फुलझाडे आणि आंब्याची चिक्कू आणि फणस झाडाची नुकसान करीत असल्याचे अनेक लोक सांगतात.

पण वन विभागाचे कार्यालय व निवासस्थान यांचेवर हौदोस घालून कार्यालयाचे नुकसान केल्याचे नुकसान भरपाई वन विभागाचे वतीने करावे लागणार असे सांगितले जात आहे.

# ब्रह्मपुरी जगातील आठव्या क्रमांकाचे उष्ण शहर

**प्रशांत डांगे**

**ब्रम्हपुरी, दि. २८ मार्च :** राज्यातील सर्वाधिक उष्ण प्रदेश म्हणून विदर्भ हळूहळू देशातील उष्ण प्रदेशाच्या यादीत येऊ लागला आहे. विदर्भातील ब्रह्मपुरी हे गुरुवारी जगातील आठव्या तर नागपूर ११ व्या आणि अकोला व चंद्रपूर १४ व्या आणि १५ व्या क्रमांकावरील उष्ण शहर ठरले आहे.

एल्डोराडा नावाच्या संकेतस्थळावर दररोज जगभरातील सर्वाधिक उष्ण व थंड शहराची यादी प्रकाशित होते त्यानुसार गुरुवारी जगातील सर्वाधिक उष्ण शहराच्या यादीत भारतातील पाच शहरे होतील यातील चार शहरे विदर्भातील असून उत्तर प्रदेशातील प्रयागराज पाचवी शहर आहे. जगभरातील गुरुवारी उष्णतेचा तापमान ब्रह्मपुरी येथे ४२.२ प्रयागराज येथे ४२ नागपूर ४१.९ अकोला ४१.७ आणि चंद्रपूर ४१.६ अंश तापमान होते. तर विदर्भातील गोंदिया ३९.५ बुलढाणा ३७.३ अंश वगळता विदर्भातील सर्वच तापमान ४०ष्ट अधिक होते. मार्च महिन्यात एवढी मोठी उष्णतेची लहर विदर्भातील ब्रह्मपुरी नागरिकांना सोसावी लागत आहे तर पुन्हा एप्रिल,मे महिना बाकी असून या महिन्यात पुन्हा उष्णतेची लाट येण्याची शक्यता नाकारता येत नाही नागरिकांनी घरातून पुन्हा निघताना सावधगिरी बाळगून आणि स्वतःची काळजी घेण गरजेचे आहे.

ब्रह्मपुरी शहरे दगडावर बसले असल्याने जास्त उष्णता वाढत असल्याचे बोलले जाते. कडक उन्हाळ्यात नागरिक कामानिमित्त बाहेर पडताना दिसत असून शहरात दुपारच्या सुमारास जास्त प्रमाणात वर्दळ दिसून येत नाही.

# कन्हाळगाव येथे तीन दिवसीय सावजी महाराज पुण्यतिथी महोत्सव

## ३० मार्च ते १ एप्रिल २०२५ पर्यंत आयोजन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**सिंदेवाही, दि. २८ मार्च :** तालुक्यातील श्री संत सावजी महाराज सेवा समिती कन्हाळगांव यांचे सौजण्याने रविवार ३० मार्च ते १ एपील ला तीन दिवसीय श्री संत सावजी महाराज पुण्यतिथी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी, विठ्ठल - रूक्मिणी प्राणपतिष्ठा वार्षिक महोत्सव तथा ग्राम जयंती महोत्सव आयोजित केलेला आहे.

कार्यक्रमाची रूपरेषा रविवार ला सकाळी ९ वाजता श्री विठ्ठल - रूक्मिणी व श्री संत सावजी महाराज यांच्या मुर्तीचे अभ्यंग स्नान, पुजाअर्चा व घटस्थापना, १० ते १ वाजता श्री संत सावजी महाराज भजन मंडळ कन्हाळगांव यांचा भजनाचा कार्यक्रम, दुपारी ३ ते ५ वाजता श्री सत्संग भजन मंडळ सावर्ला यांचा भजनाचा कार्यक्रम, सायंकाळी ७ वाजता हरिपाठ, रात्री ९ वाजता सत्यपाल महाराज यांचे शिष्य विहीरगांव येथील सप्तखंजेरीवादक पब्रोधनकार सुभाष नन्नावरे यांचे जाहिर किर्तन, सोमवार ला सकाळी ५ वाजता ग्राम सफाई, ८ वाजता रांगोळी स्पर्धा, १० ते १ वाजता श्री गुरूदेव भजन मंडळ कन्हाळगांव यांचा भजनाचा कार्यक्रम, सायंकाळी ७ वाजता हरिपाठ, रात्री ८-३० वाजता काटोल येथील मनोज बैस यांचे जाहिर किर्तन, रात्री बाहेर गावावरून आलेल्या भजन मंडळांचे जागृती भजन, मंगळवार ला सकाळी ५ वाजता ग्राम सफाई, ७ वाजता मान्यवरांचे उपस्थितीत दिंडी सोहळा, दुपारी १२ वाजता मनोज बैस यांचे गोपाल काल्याचे जाहीर किर्तन, दुपारी ३ वाजतापासुन महापसाद.

वरिल पमाणे विविध कार्यक्रयाचे आयोजन केलेले आहे. महोत्सवामध्ये परिसरातील समस्त नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केलेले आहे.

# सिंदेवाही तालुक्यात जिवंत सातबारा मोहीम

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**सिंदेवाही, दि. २८ मार्च :** महसूल विभाग १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत १ एप्रिल २०२५ पासून सिंदेवाही तालुक्यातील सर्व गावात जिवंत सातबारा मोहीम राबविण्यात येणार आहे. जिवंत सातबारा मोहीम अंतर्गत शेतकऱ्यांच्या सातबारा उताऱ्यावर असणाऱ्या गावातील सर्व मृत खातेदारांची नावे कमी होणार असून त्या ऐवजी आता वारसांची नावे लागणार आहेत. बऱ्याचदा सातबारावर वारसांच्या नावाने नोंद नसल्याने शेतीविषयक योजना, पी एम किसान, किसान ओळखपत्र, विमा व अनुदान मिळत नाही. जमीन खरेदी-विक्री किंवा कर्ज मिळवताना अडचणी येतात. त्यामुळे जिवंत सात बारा या मोहिमेची गरज भासली असून या मोहिमेअंतर्गत प्रत्येक गावात १ ते ५ एप्रिल दरम्यान तलाठी गावात चावडी वाचन करतील. या वाचनादरम्यान न्यायप्रविष्ट प्रकरणे सोडून गावनिहाय मृत खातेदारांची यादी तयार करण्यात येणार आहे. ६ ते २० एप्रिल दरम्यान वारसा संबंधित कागदपत्रे जसे की अर्ज, प्रतिज्ञापत्र, वारस दाखला, मृत्यू दाखला शेतकऱ्यांना तलाठ्यांकडे सादर करता येतील किंवा ।- हक्क प्रणाली ऑनलाईन अर्ज सादर करता येईल. स्थानिक चौकशी करून मंडळ अधिकारी हे वारस ठराव ई - फेरफार प्रणालीमध्ये मंजूर करतील. २१ एप्रिल ते १० मे या कालावधीत तलाठी हे ई फेरफार प्रणालीमध्ये मृत खातेदारांऐवजी वारसाचे नाव नोंदवतील. त्यानंतर मंडळ अधिकारी वारस फेरफारवर निर्णय घेऊन सातबारा दुरुस्त करतील जेणेकरून मृत व्यक्तीच्या ऐवजी वारस व्यक्तीचे नाव सातबारावर येईल असे तहसीलदार संदीप पानमंद यांनी सांगितले. सिंदेवाही तालुक्यातील गावागावात या मोहिमेबद्दल सध्या जागृती करण्यात येत आहे.

# उपरवाही येथील शाळेला जिल्हाधिकाऱ्यांची भेट

## विद्यार्थ्यांसोबतही साधला संवाद



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ मार्च :** १०० दिवस कृती आराखडयाअंतर्गत जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी आठवडयातून किमान दोन दिवस क्षेत्रीय भेटी दरम्यान केंद्र व राज्य शासनाच्या प्रकल्पांना भेटी देऊन कामाच्या प्रगतीची पाहणी करावी, अशा राज्य शासनाच्या सुचना आहेत. त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी कोरपना तालुक्यातील उपरवाही येथील जि.प.उच्च प्राथमिक शाळेला भेट दिली. तसेच विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला.

'मुख्यमंत्री माझी, शाळा सुंदर शाळा' टप्पा-२ सन २०२४-२५ अंतर्गत जिल्हयात दुसरा क्रमांक मिळाला आहे. या शाळेत नाविन्यपूर्ण विज्ञान व गणित प्रयोगशाळेतुन शिक्षण, इकोक्लब सदस्यामार्फत पर्यावरण जागृती व संरक्षण, मतदान जागृतीसाठी विद्यार्थ्यांचे पथकाद्वारे सादरीकरण, एक भारत श्रेष्ठ भारत अंतर्गत उपक्रम, बाल वाचनालय नियमित वापर, सावित्रीबाई फुले बचत बँकेच्या माध्यमातुन आर्थिक देवाण घेवाण, विपुल भारत अंतर्गत माता-पालक गटाची स्थापना व गट कार्यरत, आशा व अंगणवाडी सेविका मार्फत किशोर वयीन मुलींना मार्गदर्शन, निपुण महाराष्ट्र कृती कार्यक्रम राबविण्यात येतात.

यावेळी जिल्हाधिका-यांनी शाळेत सुरु असलेल्या प्रशंसनीय उपक्रमाबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली. तसेच विद्यार्थ्यांचे कौतुकसुध्दा केले.

भेटी दरम्यान उपविभागीय अधिकारी रविंद्र माने, तहसीलदार पल्लवी आखाडे, संवर्ग विकास अधिकारी, गटशिक्षण अधिकारी आदी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय दुहेरी नृत्य स्पर्धेत सरदार पटेल महाविद्यालयाला पुरस्कार

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ मार्च :** गडचिरोली जिल्ह्यातील देसाईगंज येथील आदर्श कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राज्यस्तरीय आयोजित राज्यस्तरीय दुहेरी नृत्य स्पर्धेत येथील सरदार पटेल महाविद्यालयाला तृतीय पुरस्कार मिळाला आहे.



या स्पर्धेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पी.एम.काटकर यांनी कौतुक करीत भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या स्पर्धेसाठी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.अजय बेले यांच्यासह प्रा. संदेश पाथर्डे, डॉ. सपना वेगिनवार, डॉ. संजय उराडे, डॉ. निलेश चिमुरकर, डॉ.बिरादर, डॉ.अनिता मत्ते, डॉ.आरती दीखीत, प्रा.अपर्णा तेलंग व प्रा.आशा सोनी यांनी परिश्रम घेतले.

दरम्यान सर्वोदय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अरविंद सावकार पोरेड्डीवार, कार्याध्यक्ष आ. किशोर जोरगेवार, उपाध्यक्ष सुदर्शन निमकर, सगुणा तलांडी, सचिव प्रशांत पोटदुखे, सहसचिव कीर्तीवर्धन दीक्षित, कोषाध्यक्ष संदीप गड्डमवार, सर्वोदय शिक्षण मंडळाचे कार्यकारी सदस्य राकेश पटेल, सुरेश पोटदुखे, चंद्रशेखर वाडेगावकर, जीनेश पटेल यांनी या यशाबद्धल विजयी विद्यार्थांचे अभिनंदन करीत शुभेच्छा दिल्या आहेत.

# रोजगार मेळावे - कौशल्य व संधी यांचा सेतू - आ. किशोर जोरगेवार

## चंद्रपूरमध्ये पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ मार्च :** आजचा पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा हा केवळ एक औपचारिक कार्यक्रम नसून तरुणाईच्या भविष्याला दिशा देणारा महत्त्वाचा उपक्रम आहे. तरुणांच्या मनात असलेली ऊर्जा आणि उद्योजकतेची वृत्ती योग्य दिशेने वळवली, तर आपण आपल्या समाजाच्या सर्वांगीण प्रगतीला हातभार लावू शकतो. कौशल्य विकास हाच भविष्यातील यशाचा मंत्र असून रोजगार मेळावे हे कौशल्य आणि संधीचा सेतू आहेत, असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.



जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, चंद्रपूर, मॉडल करिअर सेंटर, चंद्रपूर आणि जनशिक्षण संस्थान-२, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने चंद्रपुरातील जनशिक्षण संस्था येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उद्घाटक म्हणून आमदार किशोर जोरगेवार बोलत होते. या कार्यक्रमाला उपजिल्हाधिकारी संजय पवार, जनशिक्षण संस्थानचे संचालक अमोल गायकवाड, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक ऋतूराज सुर्या, बँक ऑफ महाराष्ट्रचे एल.डी.एम. राजू नंदनवार, कर्मवीर भाऊराव पाटील संस्थेचे अध्यक्ष भाऊराव झाडे, सुभाष ढोंबरे, प्रशिक्षण केंद्राचे सहायक आयुक्त भैयाजी येरणे, रोषण गभाले आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार जोरगेवार पुढे म्हणाले की, आजचा हा मेळावा आपल्या तरुण पिढीसाठी आशेचा किरण आहे. रोजगार मिळवण्याइतकेच रोजगार निर्माण करणेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे तरुणांनी कौशल्य प्रशिक्षण घेऊन स्वतःचा व्यवसाय किंवा स्टार्टअप सुरू करण्याचा विचार करावा. शासनाच्या विविध योजना आणि मार्गदर्शन केंद्रांचा लाभ घ्यावा. आज येथे अनेक प्रतिष्ठित नियोक्ते सहभागी झाले आहेत, ज्यांनी आपल्या तरुणांना संधी दिली आहे. या संधीचे सोने करा, आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी मेहनत घ्या आणि कौशल्य आत्मसात करा असे आवाहन त्यांनी केले.

हा रोजगार मेळावा म्हणजे फक्त नोकरी मिळवण्यासाठीचा मंच नाही, तर नव्या संधींचे दरवाजे खुलं करणारा एक महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. आजच्या युगात शिक्षणासोबतच कौशल्यविकास आणि योग्य मार्गदर्शनाला विशेष महत्त्व आहे. केवळ पदवी मिळवून रोजगार मिळतोच असे नाही, तर योग्य कौशल्य असणाऱ्या युवकांना उद्योगजगतात मागणी आहे. आजचे उत्तम आयोजनामुळे जिल्ह्यातील अनेक बेरोजगार तरुणांना त्यांच्या क्षमतेनुसार संधी मिळणार आहे, असेही आमदार जोरगेवार म्हणाले.

या कार्यक्रमाला नियोक्ते, युवक आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## उपवनसंरक्षक मध्य चांदा वनविभाग, यांचे कार्यालय

**मुल रोड, चंद्रपूर**

दुरध्वनी क्र. ०७१७२-२३३५०८/२५०५६१ E-mail:- dycfcentralehana@mahaforest.gov.in.

क्रमांक - कक्ष-योजना- २(२)/२०२४-२५ -२(२)/२०२४-२५/३४३४ चंद्रपूर दिनांक २७/०३/२०२५

## ई-निविदा/ १८०

मध्य चांदा वनविभागातील परीक्षेत्रामध्ये खालीलप्रमाणे कामे करणे करिता ब-१ विवरणपत्राप्रमाणे ई-निविदा, प्रकाशित टक्केवारी दराने नोंदणीकृत कंत्राटदार यांचे कडून मागविण्यात येत आहे. निविदेच्या अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर सविस्तर तपशिलासह दिनांक ०१/०४/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध आहे. ई-निविदा ०१/०४/२०२५ ला सकाळी १०.०० ते ०८/०४/२०२५ ला सायंकाळी ५.०० पर्यंत सादर करता येईल तसेच दि. ०९/०४/२०२५ रोजी शक्य झाल्यास सकाळी ११.०० वाजता ई निविदा उघडण्यात येईल. तरी इच्छुकांनी वरील संकेत स्थळास भेट द्यावी.

| नि.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम | अनामत रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १७७ | Construction of Food Court in Manikgadh Fort Area In Jiwati Forest Range Under In Central Chanda Forest Division Chandrapur | १६९५८००/- | १६९५८/- | ५९०/- |

(जिमाअ. / चंद्र. /३५३/२०२५)

स्वा/-
उपवनसंरक्षक
मध्य चांदा वनविभाग, चंद्रपूर

# प्रकाशित व्हावेत समृध्दीचे सारे राजमार्ग!

गुढीपाडवा हा एक भारतीय सण असून मराठी आणि कोकणी हिंदूंसाठी चंद्र सौर नववर्षाची सुरुवात करणारा वसंतोत्सव आहे. हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे चंद्रसौर हिंदू कॅलेंडरच्या पहिल्या महिन्याच्या चैत्राच्या सुरुवातीला हा दिवस महाराष्ट्र, गोवा आणि दमणच्या आसपास साजरा केला जातो. शालीवाहन संवत्सराचा हा पहिला दिवस आहे.

वेदांग ज्योतिष या ग्रंथात सांगितलेल्या साडेतीन मुहुर्तापैकी हा एक मुहूर्त आहे. या दिवशी नवीन वस्तू खरेदी, व्यवसाय प्रारंभ, नव उपक्रमांचा प्रारंभ, सुवर्ण खरेदी इत्यादी गोष्टी केल्या जातात. दारी उभारलेली गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे असे मानले जाते.

गुढीपाडव्याच्या निमित्ताने हिंदू संस्कृतीची झलक दाखविणाऱ्या मिरवणुका काढल्या जातात. महिला, पुरुष, लहान मुले पारंपरिक पोशाखांत या मिरवणुकीत सहभागी होतात.

या दिवशी पाणपोई घालावी, पाण्याने भरलेल्या घड्याचे दान करावे असाही संकेत रूढ आहे. या मंगलदिनी विविध ठिकाणी पहाटेच्या सांस्कृतिक मैफिली उत्साहाने आयोजित केल्या जातात. रसिकांचा वाढता प्रतिसाद दिवाळी पहाट, नववर्ष पहाट व गुढीपाडवा किंवा हिंदू नववर्ष पहाट या उपक्रमाला मिळत आहे.

चैत्र शुद्ध प्रतिपदेला लवकर उठतात, स्नान करतात, स्नान इ.दैनंदिन कर्मे झाल्यावर सूर्योदयानंतर ही गुढी उभारतात. या दिवशी महाराष्ट्रात लोक घराच्या प्रवेशद्वारी उंचावर गुढी उभारतात. उंच बांबूच्या काडीला कडूनिंबाची डहाळी, काढीच्या वरच्या टोकाला रेशमी वस्त्र अथवा साडी गुंडाळतात, फुलांचा हार आणि साखरेची गाढी बांधून त्यावर तांब्या/धातूचे भांडे बसवले जाते, गुढीचा बांबू पाटावर उभा केला जातो, तयार केलेली गुढी दारात, उंच गच्चीवर लावतात. गुढीला गंध, फुले, अक्षता वाहतात व निरांजन लावून उदबत्ती दाखवतात. दुपारी गोडाचा नैवेद्य दाखवून संध्याकाळी पुन्हा हळद-कुंकू फुले वाहून गुढी उतरवली जाते.

यादिवशी आनंद साजरा करीत आप्तेष्टांना नववर्षाच्या शुभेच्छा, गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या जातात. चैत्र शुध्द प्रतिपदा हा दिवस कर्नाटक आणि आंध्रप्रदेश अशा गौतमीपुत्राची सत्ता असलेल्या राज्यांत स्वातंत्र्य प्राप्तीचा आनंद झाल्यामुळे विजयदिन म्हणून संवत्सर पाडवो वा उगादी अशा वेगवेगळ्या नावांनी व वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात येतो. प्रामुख्याने महाराष्ट्रात या सणाला गुढीपाडवा असे संबोधले जाते. सिंधी लोक चेटीचंड नावाने या उत्सवाला संबोधतात.

वर्षप्रतिपदेच्या दिवशी विघ्नहर्त्या गणपतीचे, देवादिकांचे स्मरण, पूजन करतात. गुरू, वडीलधाऱ्यांना वंदन करावे, अशीही रूढी आहे. त्यानंतर संवत्सर फल श्रवण करावे, असा संकेत रूढ आहे.

संवत्सर फल म्हणजे काय? तर त्या पाडव्यापासून जे संवत्सर म्हणजे वर्ष सुरू होत असते, त्या वर्षाच्या पहिल्या दिवशी आणि नंतरच्या काही विशिष्ट दिवशी असणारी स्थिती - जसे वार, चंद्र, नक्षत्र, सूयार्चे विविध नक्षत्रप्रवेश इत्यादी संदर्भांवरून हे संवत्सर फल दिलेले असते. संवत्सर फलात देशकालाचाही निर्देश असतो, म्हणजे देशाच्या कोणत्या



भागात सुखसमृद्धी असेल ते संवत्सर फलात त्रोटकपणे सांगितलेले असते.

वर्षप्रतिपदेच्या म्हणजे गुढीपाडव्याच्या दिवशी जो वार असेल त्या वाराचा जो ग्रह असेल तो त्या संवत्सराचा अधिपती असे मानले जाते. म्हणजे आजपासून सुरू होणारे वर्ष हे जर मंगळवारी सुरू होत असेल तर मंगळ हा त्या वर्षाचा अधिपती असे समजले जाते.

साठ संवत्सरांची वेगवेगळ्या पद्धतीने विभागणी केली आहे. एका विभागणीत पाच संवत्सरांचे एक युग अशा पद्धतीने साठ संवत्सरांची बारा युगे मानली जातात. तसेच संवत्सर चक्रातील ८ व्या भाव नावाच्या संवत्सरापासून विजय या २७ व्या संवत्सरापर्यंत २० संवत्सरांचा स्वामी पालनकर्ता विष्णू आहे असे मानले जाते.

ब्रह्मदेवाने पहिली तिथी सर्वात श्रेष्ठ म्हणून घोषित केली. तिला पहिले पद मिळाल्याने ती प्रतिपदा म्हणून ओळखली जाते असे मानले जाते. या तिथीला युगादी तिथी असेही म्हणतात.

तेलगु भाषेत गुढी या शब्दाचा अर्थ लाकूड अथवा काठी असा आहे तसाच तो तोरण असाही आहे. दाते, कर्वे लिखित महाराष्ट्र शब्दकोशाचा आधार घेतला तर गुढ्या या शब्दाचा अभिप्रेत अर्थ त्या शब्दकोशाने खोपटी, झोपडी, अथवा पाल असा दिला आहे.

हिंदीत कुडी या शब्दाचा एक अर्थ लाकूड उभे करून उभारलेली कुटी अथवा झोपडी असा होतो. राहण्याची जागा या अर्थाने गुडी हा शब्द येऊन दक्षिणेतली आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू खासकरून आंध्रातील गावांच्या नावांची संख्या अभ्यासली असता लाकूड या अर्थाने तेलगूतील गुढी या शब्दाचा अधिक वापर आणि जुन्या मराठीतील लाकूड बांबू/काठी ने बनवलेले घर, हे पाहता हा शब्द महाराष्ट्र आणि आंध्र या प्रदेशात गुढी शब्दाचा प्रचार अधिक असावा.



प्रविण बागडे
नागपूर. 9923620919
pravinbagde@gmail.com

शालिवाहनपूर्व काळात कदाचित गुढीचा लाकूड बांबू/काठी हा अर्थ महाराष्ट्रीयांच्या शब्द संग्रहातून मागे पडला असावा पण आंध्रशी घनिष्ट संबंध असलेल्या शालिवाहन राजघराण्याच्या लाकूड बांबू/काठी या अर्थाने तो वापरात राहिला असण्याची शक्यता असू शकते.

चैत्र हा अधिकमास असता, काहींच्या मते अधिकमासाच्या शुद्ध प्रतिपदेस वर्षारंभाची धार्मिक कृत्ये करावीत; तर काहींच्या मते ती शुद्ध किंवा निज चैत्राच्या प्रतिपदेस करावी, असा मतभेद आहे.

याविषयी धर्मसिंधूने निर्णय दिला आहे तो असा - अभ्यंगस्नानादी कृत्ये अधिक मासाच्या शुद्ध प्रतिपदेसच करावी; पण गुढी उभारणे, कडुलिंबाची पाने खाणे, पंचांग श्रवण करणे या गोष्टी शुद्ध चैत्राच्या प्रतिपदेस कराव्या. चैत्र शुद्ध प्रतिपदेला प्रातःकाळी ओवा, मीठ, हिंग, मिरी आणि साखर कडुनिंबाच्या पानांबरोबर वाटून खातात.

पचनक्रिया सुधारणे, पित्तनाश करणे, त्वचा रोग बरे करणे, धान्यातील कीड थांबवणे हे आणि असे अनेक औषधी गुण ह्या कडुनिंबाच्या अंगी आहेत असे आयुर्वेदात मानले जाते. शरीराला थंडावा देणाऱ्या कडूनिंबाची पाने अंघोळीच्या पाण्यात घालणे, ती वाटून खाणे हे आरोग्याच्या दृष्टीने हितकारक समजले जाते.

मध्ययुगात हा उत्सव राजा अथवा त्याच्या अधिकाऱ्याकडून साजरा केला जात असे. सात गावांचा अधिपती असलेली व्यक्तीही हा उत्सव संपन्न करीत असे. आता घरोघरी हा उत्सव साजरा होतो. सर्वांना गुढीपाडवा व नूतन वर्षाच्या मंगलमय शुभेच्छा !

■ ■ ■

# गुढीपाडवा

## शास्त्रशुद्ध परंपरा आणि अपप्रचार



हिंदु नववर्षारंभ म्हणजेच गुढीपाडवा, हा सण आपण चैत्र शुक्ल प्रतिपदेला साजरा करतो. ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली, म्हणजे सत्ययुगाला सुरुवात झाली, तो हा दिवस असल्याने या दिवशी वर्षारंभ केला जातो. गुढीपाडव्याला सुरू होणारे नवीन वर्षाचे कालचक्र हे विश्वाच्या उत्पत्तीकाळाशी निगडित असल्याने सृष्टी नवचेतनेने भारित झालेली असते. गुढीपाडव्याच्या दिवशी सूर्योदयानंतर लगेचच मांगल्याचे, समृद्धीचे प्रतीक असलेल्या गुढीचे पूजन करून गुढी उभारावी, असे शास्त्रात सांगितले आहे. मात्र, आज फेसबूक, व्हॉट्स ॲप यांसारख्या सामाजिक संकेत स्थळांवरून गुढीपाडव्याविषयी अपप्रचार केला जात आहे.

**अपसमज १ :** शुभ समजला जाणारा कलश गुढीपाडव्याच्या दिवशी उलटा का लावतात?

खंडन : गुढीवर उलटा घालण्यात आलेल्या कलशाच्या काही प्रमाणात निमुळत्या झालेल्या भागातून तो ब्रह्मांडमंडलातून प्रजापति-लहरी आकृष्ट करून घेतो. या लहरी कलशात सामावून रहातात. कलश उलट घातल्यामुळे ती स्पंदने भूमंडलाकडे आणि पूजकाकडे प्रक्षेपित होतात. देवळातील कळस हा सुद्धा याचप्रमाणे वरच्या दिशेने पूर्णपणे निमुळता असतो आणि तो लहरी आकृष्ट करतो.

**अपसमज २ :** ब्राह्मणांनीच शंभूराजांची हत्या करून गुढी उभारायला प्रारंभ केला!

खंडन : वर्ष १६८९ मध्ये औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांचे हालहाल करून अखेर फाल्गुन अमावास्येच्या दिवशी मारले. दुसऱ्या दिवशी चैत्र शुक्ल पक्ष प्रतिपदा, म्हणजेच गुढीपाडवा हा हिंदूंचा नववर्षदिन होता. हिंदूंनी तो साजरा करू नये, असा औरंगजेबाचा त्यामागे हेतू होता.

वस्तूतः हत्येचा गुढीपाडव्याच्या दिवशी उभारल्या जाणाऱ्या गुढीशी काहीच संबंध नाही. औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांना हालहाल करून मारले, हा सूर्यप्रकाशाइतका स्वच्छ इतिहास आहे. अनेक ठिकाणी तो संदर्भासह उपलब्धही आहे. आजपर्यंत एकाही इतिहासकाराने छत्रपती संभाजी महाराजांना ब्राह्मणांनी मारले, असे म्हटलेले नाही. असे असतांना क्रूरकर्मा औरंगजेबाचे पाप झाकण्याचा प्रयत्न का होत आहे? याचा विचार हिंदूंनी करायला हवा.

गुढीपाडव्याविषयी जातीद्वेषमूलक प्रसाराला बळी पडू नये. हिंदू संस्कृतीनुसार प्रत्येक हिंदूंनी गुढीपाडवा साजरा करून धर्माचरणाचे पालन करावे. प्रभु श्रीराम वनवास संपवून अयोध्येत परतले, तेव्हापासून गुढ्या उभारणे, तोरणे लावणे, ही परंपरा आहे.

सृष्टीच्या निर्मितीचा दिवस म्हणूनही गुढीपाडव्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ब्रह्मदेवाने याच दिवशी सृष्टी निर्माण केल्याचे मानले जाते. म्हणजेच खरे तर हा दिवस केवळ हिंदूंचाच नसून अखिल विश्वातील मानवजातीचा आहे.

**अपसमज ३ :** गुढीपूजनाच्या वेळी पालथा गडू आणि लुगडे यांचा वापर म्हणजे अशुभ समजणे.

गुढीपूजनाच्या वेळी पालथा गडू आणि लुगडे यांचा वापर करून उभारलेली गुढी ही विटंबना आहे. गुढी उभारताना पालथा गडू, लुगडे यांचा वापर न करता भगवा ध्वज उभारून मंगल कलशाची पूजा करावी. अशा प्रकारचे आवाहन सध्या सामाजिक माध्यमांवर सर्वत्र प्रसारित होत आहे. अशा आवाहनांमुळे हिंदूंमध्ये संभ्रम निर्माण होऊन ते धर्माचरणापासून वंचित राहतात ! तेव्हा शास्त्रानुसार गुढीपूजन कसे करावे, याची शास्त्रशुद्ध माहिती असणे आवश्यक आहे.

आपण ज्याला गुढी म्हणतो, त्याचे प्राचीन नाव ब्रह्मध्वज आहे. त्यामुळे ब्रह्मध्वजाचे पूजन असे म्हटले पाहिजे. गुढी हा शब्द संस्कृत नाही, तर पाडवाह्न प्रतिपदेचा अपभ्रंश आहे. ब्रह्मध्वजपूजनाविषयीची माहिती ' धर्मसिंधु ' या ग्रंथात सुद्धा उपलब्ध आहे. हिंदूंसाठी चैत्र मासापासून वर्षारंभ असून त्याला दक्षिण भारतात उगादी असेही म्हणतात.

सृष्टीचा निर्माता ब्रह्मदेव असून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या दिवशी ब्रह्मध्वजपूजन करतात आणि तेव्हापासून रामनवरात्र देखील सुरू होते. ब्रह्मध्वजाला हिरवी साडी किंवा निळे कापड अथवा भगव्या वणार्ची साडी, भगवे वस्त्र नेसवतात आणि हे परंपरेला धरून आहे. पूर्वी सुवर्ण किंवा चांदीचे पात्र हे गुढीवर पालथे घातले जाई. पूर्वी देवघरातील देवतांची पात्रे ही चांदीविना इतर कोणत्याही धातूची नव्हती. ही जुनी परंपरा लुप्त होत आहे. कालातरांने चोऱ्या वाढल्या म्हणून चांदीचे भांडे ठेवणे बंद झाले. त्यामुळे सध्या तांब्याचे भांडे वापरले जाते.

खरेतर सुवर्ण, चांदी आणि कांस्य यांचा वापर गुढी उभारतांना व्हायला हवा; पण ते शक्य नसल्याने तांबे वापरले जाते. स्टील किंवा प्लास्टिक यांचा वापर पूजनामध्ये करता कामा नये. या दिवशी ब्रम्हांडात प्रजापती लहरी सर्वाधिक कार्यरत असतात.

गुढीवर भांडे पालथे ठेवल्याने त्याद्वारे ब्रम्हांडातील प्रजापती लहरी अधिकाधिक ग्रहण करता येतात. मुळात कलश पालथा ठेवणे, हे अशुभ असते, हे कोणी ठरवले? पूर्वीच्या काळी एखादी व्यक्ती बाहेर गेली आणि तिला येण्यास विलंब झाल्यास उंबऱ्यावर पालथा घडा ठेवून तिची वाट बघितली जात असे. याचा अर्थ चांगल्याची वाट बघणे. गुढीवर पालथा कलश ठेवणे म्हणजे नववर्षदिनापासून हिंदू चांगल्या दिवसांची वाट पहातात, असाही आहे.

गुढीपाडवा हा हिंदूंच्या अद्वितीय कालगणनेचे प्रतीक आहे. तो जीवनातील शुभारंभाचे प्रतीक आहे. त्यामुळे कोणत्याही अपप्रचाराला बळी न पडता, धर्मशास्त्रानुसार गुढीपाडवा पारंपरिक पद्धतीने साजरा करायला हवा. तेव्हाच खऱ्या अर्थाने सण आणि उत्सव यांमध्ये पावित्र्य राहणार आहे. त्याचा व्यक्तिगत जीवनात आणि सामाजिक दृष्टीनेही सकारात्मकता वाढण्यास मदत होणार आहे.

---------------

**संदर्भ : दैनिक सनातन प्रभात**
**संकलक : सौ. अंजली पाध्ये**
**९९७५५३६९०६**

■ ■ ■

# व्यवस्थेच्या विकृतीवर घणाघात करणारी झुंझार कविता : बा स्वातंत्र्या!

शंकर घोरसे हे कामगार कवी, कलावंत जिंदादिल व्यक्तीमत्त्वाचे उपक्रमशील धनी आहेत. त्यांचा 'बा स्वातंत्र्या' हा पहिलाच कवितासंग्रह त्यांच्या चिंतनक्षमतेची वैचारिक प्रगल्भता लक्षात आणून देतो. या संग्रहात त्यांच्या बहुआयामी प्रतिभेने अनेक विषयांना स्पर्श करीत, काव्य रसिकांना एक दमदार नजराणा बहाल केला आहे.

'बा स्वातंत्र्या' या पहिल्याच स्फोटक कवितेत ते सामान्यांच्या मनात खदखदणाऱ्या प्रश्नांना उद्गार देतात. गरिबी, भ्रष्टाचार, जातीवाद, कुपोषण, कुपोषणाची सवय झालेली जनता, स्वातंत्र्याचा गजर करायला बाध्यच आहे : हे त्यांनी प्रखर उपरोधिक शैलीत पटवून दिले आहे. 'विकास आणि प्रगती' या कवितेत त्यांनी सत्तेतल्या सुभेदारांना लाजवून सोडलं आहे.

शंकर घोरसे हे लेखणीत वास्तवाचा विस्तव घेऊन कविता लिहिणारे सूर्यकुलातले बंडखोर कवी आहेत. ते प्रांजल आहेत म्हणूनच हुंडा घेणा?या देणाऱ्यांचा, खादीतल्या खादाडांचा, लबाड चाकरमान्यांचा, अंधश्रद्धा पोसणाऱ्यांचा, संवेदनाहीन पुढाऱ्यांचा (जोडे मारून उद्धार करा असं न म्हणता) उपरोधाने सत्कार घ्या म्हणतात. निर्भय, नितीवान कवीच असं धाडस करू शकतो! कवीने सत्ताधाऱ्यांची विदर्भावरची अवकृपा सडेतोड शब्दात अधोरेखित केलीय.

नागपूर जिल्ह्यातील मोवाड हे कवी शंकर घोरसे यांचे जन्मगांव. ते वर्धा नदीच्या महापुरात पार बेचिराख झालं. त्या गावाची व तिथल्या शाळेची वेदनादायक आठवण या संवेदनशील कवीने अंतःकरणात सुरक्षित ठेवलीय. देवशरणेत गुंतल्यावर शेंदूर फासलेल्या दगडाला देवच म्हणावे लागते.

कवी म्हणतो -

*दगड पायरीचा.. किंवा मंदिराचा*
*शेवटी दगडच असतो....*

नीतिवान माणूस निर्भीड असतो. तो सत्य सांगायला कचरत नाही. नीती नसलेल्या लोकांनी कायदा तयार केला तर न्याय पदरी पडत नाही. हे मोठे भाष्य कवीने कायद्यावर केलंय.


महात्मा फुले, सावित्रीमाई फुले इत्यादी महापुरुषांच्या तेजस्वी विचारांवर कवीचा ठाम विश्वास आहे. म्हणून त्याचा तळहाताच्या रेषा पाहून भविष्य सांगणाऱ्या भंपक बनवाबनवीवर विश्वास नाही.

निसर्गातील ऊर्जा कधीतरी संपेल म्हणून या चिंतनधर्मी कवीने ऊर्जेचे संवर्धन करण्याचे आवाहन केले आहे. झाडं लावायचं आवाहन करीत कवीचा निसर्गाकडे सर्वांसाठी शुद्ध पाणी, शुद्ध हवा मागायचा यत्न स्तुत्य आहे.

*वैश्विक तापमानाचा*
*जाणवतो आहे कहर*
*बदलत चालले ऋतू*
*सूर्य ओकतोय जहर..*

या ओळी कवीच्या चिंतन क्षमतेचे प्रमाण आहे.

कवी शंकर घोरसे स्वतंत्रपणे



स्वतःच्या शब्दांत आपला अनुभव अक्षरबद्ध करतात. ते महागाईवर प्रहार करतात. ऐतिहासिक भिडेच्या वाड्यावर, जीर्ण अवशेषावर आसूड उगारतात. अन्नदात्यांच्या मरणकळा पाहून गाढ निद्रेत झोपलेल्या सत्ताधाऱ्यांना नागवं करतात. त्याचवेळी कोरडी कविता न लिहिता रक्तदान, अन्नदान, नेत्रदान, ज्ञानदान, श्रमदान, न्यायदान करत देहदान करायची प्रतिज्ञाही करतात.

हे करत असतांना तिजोरीचं धरण, दातृत्वाचा पाऊस, इच्छाशक्तीचे कालवे अश्या नव्या प्रतिमांचं अन्वेषण करतात. म्हणून मी या जिगरबाज कवीला वैदर्भीय मातीचा सन्मान वाढवणारा कवी म्हणतो. ते केवळ कवी, कलावंत नाहीत अक्षरक्रांती संस्थेच्या माध्यमातून अनेक प्रतिभांना वाव देऊन समोर आणणारे सांस्कृतिक संयोजकही आहेत. याचे मला भूषण वाटते.

कवी शंकर घोरसे म्हणतात,

*तुला म्हणून सांगतो...!*
*मी कवी नाही फारसा*
*कविताच माझा आरसा*

कवितेत खूप मोठी क्षमता अस्ते. कविता कसं वागायचं, कसं जगायचं हेही शिकवते. कवी शंकर घोरसे मी कवी नाही फारसा म्हणत असले तरीही ते अस्सल कवी आहेत. सामाजिक भान, माणसांच्या वेदना जपणारी कविताच खरी कविता असते. या कवीने संस्कृतीच्या नावावर चाललेल्या बेछूट विकृतीचे विच्छेदन केले आहे.

कर्णकर्कश डीजेवाल्यांच्या, अंगविक्षेपपटुंच्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले आहे ! म्हणूनच कवीला समाजाचा, वर्तमानाचा डोळस भाष्यकार असं म्हटलं जाते.

महिलांना समजावतांना कवी आपुलकीने म्हणतो,

*माहेरचा उंबराठा*
*ओलांडून*
*सासरचा धागा*
*जोडायचा असतो*
*आणि दुःखाच्या*
*डोंगरावरून*
*सुखाची हिरवळ*
*पहायची असते !*

कवीच्या स्पंदनशील मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. सावित्री नावाची ज्योत जळता-जळता विझून गेली. तरी स्त्रीवरचे अत्याचार का संपत नाही? समता का निर्माण होत नाही? न्यायाला अन्यायच का मिळतो? स्वातंत्र्याचे वैरी रस्तोरस्ती का दिसतात? या प्रखर संवेदनशील कवीच्या मनातील प्रश्नांची मालिका संपत नाही.

*स्वार्थाने बरबटलेल्या*
*सुशिक्षित गिधाडांनी*
*आजवर किती वाती विझविल्या*
*असतील त्या गर्भात*
*सांगता येत नाही...*
*वंशाला एका*
*दिव्याच्या आशेसाठी...!*

कवीने उपस्थित केलेला हा स्त्रीभ्रूण हत्येवरचा प्रश्न मेंदूच्या ठिकऱ्या उडवणारा आहे. कटी - मिठीवर, आलिंगन - चुंबनावर कविता लिहिणाऱ्या गुलछबू कामचलाऊ कवींना असे प्रश्न पडत नसतात. ते त्यांच्या दुनियेत खुश असतात. या सामाजिक भान तेजाळत ठेवणाऱ्या कवीचा नवीन कवितासंग्रह यायला हवा. या कवीच्या कवितांना अथार्चं तेजस्वी सोनं लगडलं आहे.

कवी शंकर घोरसे राजकारणी सत्ताधीशांवरही आसूड उगारतात. त्यासाठी कवी निर्भय असावा लागतो. ते म्हणतात,

*पुढाऱ्यास सदा भ्रष्टाचारा वाव*
*घटनेशी घाव घालीतसे....!*

घोटाळ्यांचा कळस गाठणाऱ्या निगरगट्ट सत्ताधिशांचाही पुतळा उभारला पाहिजे; अशी विखारी टीका ते करतात.

सॉक्रेटीसचा शिष्य प्लेटो म्हणाला होता, राजसत्ता ही विवेकी, बुद्धिमान, सुज्ञ लोकांच्या हाती असावी. राज्यकर्ते शुद्ध चरित्र्याचे, निस्वार्थी, चिंतनशील असावेत. ज्ञानसाधनेत रमणारे असावेत. असा राज्यकर्ता शोधून तरी सापडेल का?



डी. बी. जगत्पुरिया
9860485398
मीरानगर, पडेगांव,
औरंगाबाद.

-------

(उर्वरीत भाग उद्या)

■ ■ ■

## मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक

# डॉ. नागनाथ कोत्तापल्ले

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांची आज जयंती. मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी. ए. ची पदवी मिळवली. बी. ए. ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी. एचडी. मिळवली.

१९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंब?या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले.

डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सर ३० नोव्हेंबर २०२२ रोजी आपल्यातून निघून गेले. वयाच्या ७४ वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ. नागनाथ कोत्तापल्ले सरांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

-----------

**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

■ ■ ■

# गरोदरपणा आणि कोल्ड्रिंक्स...



गरोदरपणात महिलांनी त्यांच्या आहाराची विशेष काळजी घेतली पाहिजे. कारण या दिवसात अन्नाबाबत थोडीशीही निष्काळजीपणा गरोदर स्त्रीचे आरोग्य बिघडू शकते. गर्भधारणे दरम्यान डॉक्टर महिलांना अनेक गोष्टी खाऊ किंवा पिऊ नयेत याचा सल्ला देतात. कारण त्यामुळे आरोग्य बिघडण्याचा धोका असतो,

पण गरोदरपणात अनेक महिलांना प्रश्न पडतो की कोल्ड्रिंक्स पिऊ शकतात का? यामुळे शरीराला कोणते नुकसान होते का? कोल्ड्रिंक्समुळे साखरेची पातळी वाढू शकते का?

स्त्रीरोग विभागाच्या डॉ. सलोनी चड्ढा सांगतात की गर्भवती महिलांनी कोल्ड्रिंक्स पिणे टाळावे. याचे कारण म्हणजे कोल्ड्रिंक्समध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे मधुमेहाचा धोका वाढू शकतो. काही कोल्ड्रिंक्समध्ये कॅफिनचे प्रमाण अधिक असते, ज्यामुळे महिलेला झोपेशी संबंधित समस्या उद्भवू शकतात.

कोल्ड्रिंक्समध्ये कृत्रिम गोड पदार्थ असतात, त्यामुळे मधुमेहाचा धोका देखील वाढू शकतो. जरी तुम्ही ते महिन्यातून एकदा पिऊ शकता, परंतु लक्षात ठेवा की तुमची साखरेची पातळी जास्त नसावी. जर तुमच्या साखरेची पातळी जास्त असेल तर कोल्ड्रिंक्स प्यायल्याने तुमच्या शरीराला नुकसानदायक ठरू शकते.

गरोदरपणात आहार कसा असावा?

गरोदरपणात शरीरासाठी फॉलिक ॲसिड आणि लोह खूप महत्वाचे असतात. यासाठी याची कमतरता भरून काढण्यासाठी औषधे देखील आहेत, परंतु यामध्ये खाण्याच्या सवयींकडेही विशेष लक्ष दिले पाहिजे. याशिवाय आहारात कॅल्शियम, प्रथिने आणि जीवनसत्त्वे चांगल्या प्रमाणात असावीत.

यासाठी आहारात ताजी फळे आणि भाज्या, संपूर्ण धान्य, डाळी आणि बीन्स आणि दूध झ्र दही यांचा समावेश करावा. या गोष्टींमध्ये प्रथिने, जीवनसत्त्वे आणि कॅल्शियम भरपूर प्रमाणात असतात. जर महिलांनी गरोदरपणात हे पदार्थ चांगल्या प्रमाणात खाल्ले तर आई आणि बाळ दोघेही निरोगी राहतात.

गरोदरपणात जड व्यायाम टाळा. दारू, सिगारेट आणि मद्यपान करू नका. फास्ट फूड खाऊ नका. वेळोवेळी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### मानवता धर्म

जातपात धर्म देश
असो कोणताही
मानवता धमार्चे पालन
जगी सर्वश्रेष्ठ राही!

अनितीने वागता पेटतो
दोन्ही पक्षात वणवा
बरबाद होती पिढ्या
महाभारत आहे पुरावा!

अती लोभ क्रोध हा
सर्व पापांचा असे बाप
त्यावर नियंत्रण ठेवता
सुख शांती नांदे आपोआप!

## कोतवालाचे मुंबईत कामबंद आंदोलन

**महासागर शहर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. २८ मार्च :** महसूल विभागामध्ये कार्यरत असलेल्या कोतवालांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा देऊन चतुर्थ वेतनश्रेणी देण्यात यावी मिळावी, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य महसूल सेवक संघटनेच्यावतीने गुरुवारपासून (ता. २०) मुंबईच्या आझाद मैदानावर बेमुदत कामबंद आणि धरणे आंदोलन सुरू आहे. या बेमुदत आंदोलनाला पाठिंबा देत ब्रम्हपुरी तालुक्यातील कोतवाल सहभागी झाल्याने महसूल विभागातील अनेक कामे ठप्प झाली आहेत. राज्यातील महसूल सेवक (कोतवाल) यांची गेली गेल्या चाळीस वर्षापासून महसूल सेवकांची चतुर्थ श्रेणीची मागणी अजून पर्यंत शासनाने पूर्ण केलेली नाही.

## महिला बचत गटाच्या वतीने भोजनदान

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ मार्च :** थोर क्रांतिकारी व स्वतंत्रता संग्राम सेनानी वीर शहीद बाबुराव शेडमाके यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक जिल्हा मध्यवर्ती कारागृहाच्या प्रांगणात अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या आदिवासी बांधवांसाठी जय सेवा आदिवासी महिला बचत गट संस्थेतर्फे भोजनदान व पाणी वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचा लाभ जिल्हाभरातून घेणाऱ्या शेकडो आदिवासी बंधू भगिनींनी घेतला. मागील अनेक वर्षापासून संस्था सदर लोकोपयोगी उपक्रम राबवित असून या भोजनदान व पाणी वाटप करण्यात येत असते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जय सेवा आदिवासी महिला बचत गट संस्थेचे संगीता धुर्वे, मालती करांगे ,वंदना उईके, अनिता पुसद ,भाग्यश्री कुळमथे, वर्षा दळांजे आदि उपस्थित होते.

# सर्वधर्मीय सण अतिशय आनंदाने साजरे करा

### जिल्हाधिकाऱ्यांचे नागरिकांना आवाहन, शांतता समितीची बैठक

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ मार्च :** चंद्रपूर हा शांतताप्रिय जिल्हा आहे. जिल्ह्याचा हा लौकिक कायम ठेवणे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. आगामी काळात गुढीपाडवा, रमजान ईद, श्रीराम नवमी, महाकाली यात्रा, हनुमान जयंती, महावीर जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, गुड फ्रायडे आदी सण साजरे होणार आहे. हे सर्व सण अतिशय आनंदाने आणि शांततेत साजरे करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी केले.



जिल्हा प्रशासन व पोलिस प्रशासनाच्या वतीने जिल्हास्तरीय शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी जिल्हा पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, महानगरपालिका आयुक्त विपीन पालीवाल, अतिरिक्त पोलिस अधीक्षक रिना जनबंधू, सहाय्यक पोलिस अधीक्षक नियोमी साटम, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार आदी उपस्थित होते.

सर्वधर्मीय सण साजरे करताना प्रत्येकाने प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे सांगून जिल्हाधिकारी ना. गौडा म्हणाले, प्रत्येकाला आपले धार्मिक सण साजरे करण्याचा अधिकार भारतीय राज्यघटनेने दिला आहे. मात्र सण साजरे करताना इतरांना त्रास होऊ नये, याची काळजी सुद्धा घ्यावी. नागपूर घटनेच्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर जिल्ह्यात कोणतीही अनुचित घटना होणार नाही, यासाठी सर्वांनी सतर्क रहावे. गल्ली, मोहल्ला, सोसायटी येथील सर्वांना शांततेचे महत्व समजून सांगावे.

सोशल मीडियाचा वापर हा चांगला आणि वाईटसुद्धा होऊ शकतो. प्रत्येकाने जबाबदारीने सोशल मीडियाचा वापर करावा. आक्षेपार्ह पोस्ट टाकणारा हा कदाचित जिल्हा, राज्य किंवा देशाबाहेरचा सुद्धा राहू शकतो.

**जिल्हा प्रशासनाचे नियम पाळा - पोलीस अधीक्षक सुदर्शन**

पोलिस अधीक्षक सुदर्शन म्हणाले, चंद्रपूर जिल्हा हा शांततेसाठी ओळखला जातो. सर्वधर्मीय सण साजरे करताना येथील गुन्ह्यांची संख्या नगण्य आहे. नागपूरच्या घटनेवर जिल्हा पोलिस प्रशासन अतिशय अलर्ट असून जागोजागी बैठकांचे सत्र सुरू आहे. आपल्या परिसरात युवकांना सोशल मीडियाचे दुष्परिणाम समजून सांगावे. बऱ्याचशा पालकांना आपली मुलं सोशल मीडियावर काय करतात, याची कल्पना नसते. त्यामुळेच जिल्हा पोलिस प्रशासनाच्या वतीने विविध जनजागृती उपक्रम सुरू आहे. जिल्हा प्रशासनाचे नियम सर्वांनी पाळावेत व प्रशासनाला सहकार्य करावे. कोणीही कायदा हातात घेऊ नये, असे आवाहन जिल्हा पोलिस अधीक्षक सुदर्शन यांनी केले.

# अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरला वनविभागाने पकडले



**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. २८ मार्च :** चिमूर तालुकातंर्गत पळसगांव बफर झोनचा वनपरिक्षेत्रात अवैधरित्या रेती वाहतूक करणाऱ्या एका ट्रॅक्टर वर वनविभागाने धडक कारवाई करून ट्रॅक्टर जप्त केला. ही कारवाई मंगळवारी (दि.२५/०३/२०२५) रात्रीला ११ वाजताच्या सुमारास करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनूसार चिमूर तालुकातंर्गत पळसगांव बफर झोन वनपरिक्षेत्रात महसूल आणि वनविभागाच्या हद्दीतून अवैधरित्या रेतीची वाहतूक करीत असल्याची माहिती मिळाली या माहितीच्या अधारे तत्काळ नाकाबंदी लावण्यात आली. यादरम्यान एक ट्रॅक्टर आढळून आले असता सदर ट्रॅक्टर वनविभाग कार्यालयात जमा करण्यात आले हा ट्रॅक्टर सोलस कंपनीचा असून बिना नंबरचा ट्रॅक्टर रेती वाहतूकीसाठी सरास वापरला जात आहे.

ही कार्यवाही पळसगांव बीटाचे वनपाल विनोद किलन्नाके,पळसगांव वनरक्षक देवानंद खारडे,पळसगांव वनरक्षक सुमिता तरटे,व वनमजूर यांनी केली आहे.

## विहिरगाव येथे दारुबंदीसाठी समीती गठीत, अवैध दारू विक्री थांबविणार दारूबंदी समीती



**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. २८ मार्च :** २४ मार्चला ग्राम पंचायत विहीरगाव ता.चिमुर येथे महिला सभा सरपंच शितल प्रविण मूंढरे यांच्या अध्यक्षते खाली घेण्यात आली या सभेत दारूबंदी समेती गठीत करण्यात आली.

दारूबंदी समीतीच्या अध्यक्षपदी शिला युवराज गेडाम यांची निवड करण्यात आली तर उपाध्यक्षपदी दादाती अर्जुन जिवतोडे, सचिवपदी ताराबाई मारोती कोसरे , कोषाध्यक्ष उमेश मारोती कोसरे यांची निवड करण्यात आली.सदस्य म्हणून दर्शना प्रविण नन्नावरे,वर्षा बाळकृष्ण जिवतोडे,प्रेमिला रविंद्र बारेकर, बकू उत्तम श्रीरामे,कचरा दिनकर दडमल,सुशिला मारोती धारणे, सुनंदा दयाराम घरत,वैशाली समरीत बारेकर,दुर्गा तिरदास नन्नावरे,आशा चंद्रशेखर नन्नावरे, दौलत नामदेव मोहीनकर, सहदेव रामा बारेकर,मंदा कचरु नन्नावरे,निलेश खंडू रंदये,संदीप अशोक रामटेके,चंद्रकला ईटलकर,मिथून भिमराव कोसे, कविता वासुदेव जिवतोडे, कविता कैलास जिवतोडे, वनिता पांडुरंग जिवतोडे, वनिता शिवदास राणे,करीश्मा दिवाकर बारेकर,मिराबाई दिवाकर बावणे,शैलेश गुलाब पाटील,केशव दयाराम घरत, विजय रामदास नन्नावरे,आशा ईश्वर रामटेके,अश्विनी सुधाकर वाघमारे इत्यादी सदस्यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

२४ मार्चच्या महीला सभेत गावातील ग्रामस्थांनी असा ठराव मंजूर केला की,विहीरगाव परीसरात दारू अथवा मादक पदार्थांच्या वापरावर पुर्णतः बंदी किंवा निबंध करीत आहोत.कलम ३७ नुसार गावात मादक पदार्थ विक्री करण्यास किंवा दारू कारखाना स्थापन करण्यास पुर्णतः बंदी असेल यासाठी दारूबंदी समेती स्थापन करून महिला मंडळ त्यावरती नियंत्रण ठेऊन तसे आढळल्यास संबंधित व्यक्तींवर योग्य कारवाई करण्यात येईल असा असा ठराव महीला ग्रामसभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

# क्रांतीवीर लहुजी वस्ताद यांचा त्याग राष्ट्र उभारणीसाठी महत्वपुर्ण:डॉ.भगवान बाबा आनंदगडकर

**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. २८ मार्च :** गुंधा ता.लोणार जि.बुलढाणा येथे क्रांतीगुरु बहुउद्देशीय सेवाभावी संस्था गुंधा यांच्या वतीने आयोजित केलेल्या क्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे स्मृती दिनानिमित्त राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा व कवी संमेलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

ह. भ. प. डॉ.भगवान बाबा आनंदगडकर ह्यांच्या उपस्थित संपन्न झाला.या कार्यक्रमात डॉ.भगवान बाबा आनंदगडकर म्हणाले की,'हा कार्यक्रम एक आगळावेगळा आहे. या कार्यक्रमांमध्ये सर्व गाव एकत्र येऊन लहुजी साळवे यांची जयंती साजरी करत आहे . हा सोहाळा बघून खरंच या गावात समरसता आधीपासूनच नांदत आहे/ असं वातावरण महाराष्ट्रातल्या प्रत्येक गावात जर झालं तर जाती व्यवस्था नष्ट व्हायला वेळ लागणार नाही.त्यांमुळे हे गुंधा गाव हे सामाजिक दृष्टया आदर्श आहे.क्रांतीवीर लहुजी वस्ताद यांचा त्याग राष्ट्र उभारणीसाठी महत्वपुर्ण आहे' या प्रसंगी डॉ.अंबादास सगट,मातंग साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.धनंजय भिसे,प्रा विठ्ठल गीलवरकर, विजय मोरे,बबनराव ओव्हर ,रमेश ओव्हर पो पाटील ,गजानन माने,सचिन साबळे,संदिप मानकर ,पुरुषोत्तम केंद्रे,पुरुषोत्तम येऊल ,सुरेश कायंदे,अभिमन्यु वाढवे ,सुधाकर माने इत्यादी मान्यवर उपस्थितीत होते. तर ह भ प डॉ नन्हई महाराज यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.लोणार पंचायत समितीचे माजी सभापती केशवराव फुके,भूषण मापारी , ज्ञानदेव मानवतकर तसेच कार्यक्रमाचे मुख्य संयोजक शंकराव मानवतकर आणि गुंदा गावचे सर्व नागरिकांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. या वेळी महाराष्ट्रा तील अनेक गुणवंतांना पुरस्काराने गौरविण्यात आले.तसेच राज्यातील कविंनी उत्तमोत्तम कविता सादर केल्या.

## विद्यार्थ्यांना रमजान ईद निमित्त शेवयी, साखर व खारीक वाटप



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. २८ मार्च :** नैसर्गीक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्था शाखा राजुरा जिल्हा चंद्रपूर तर्फे रमजान ईद निमीत्त महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय राजुरा येथील विद्यार्थ्यांना शेवयी, साखर व खारीक चे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशांत पाटील, प्राचार्य, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय राजुरा या-ची उपस्थिती होती. तर प्रमुख अतिथी म्हणुन नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्थेचे मिलींद गड्डमवार, तालुका संघटक , किरण कोल्हापुरे, महीला तालुका अध्यक्षा, विलास कुंदोज-वार, नागपूर विभाग अध्यक्ष, स्मिता धोटे, पर्यवेक्षक, महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, बादल बेले, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन व आभार मोहनदास मेश्राम, चंद्रपूर जिल्हाध्यक्ष यांनी केले. प्रास्ताविक बादल बेले यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी सामूहिक राष्ट्रवंदना घेण्यात आली. कार्यक्रमाला सूनैना तांबेकर, माधुरी गड्डमवार, अंजली गुंडावार, अल्का गंगशेट्टीवार, संगिता पाचघरे, मेघा धोटे, माधुरी डफाडे, उषा टोंगे, कोरपना तालुका महिला अध्यक्ष, अरुणा सालवटकर, कोरपना तालुका महीला सचिव, श्रीरंग ढोबळे, संतोष देरकर, बबलू चव्हाण, रवी बुटले, भास्कर करमनकर, प्रथमेश तांबेकर आदींनी परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. यावेळी नैसर्गीक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्थेचे नवीन सदस्य संघटक व नुतनीकरण केलेल्या सदस्यांना नियुक्तीपत्र व ओळखपत्र देण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगतातून प्रशांत पाटील यांनी सर्वधर्म समभाव जपत सण समारंभ आनंदाने साजरे केले पाहिजेत. सोबतच सामाजिक जाणिव जोपासत समाजातील लोकांना सहकार्य, मतद केली पाहिजेत. नैसर्गीक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्थेच्या कार्यात पर्यावरण सोबतच मानवता विकासाचे,जनजागृती, मदतीचे अनेक उपक्रम राबविले जातात याबद्दल समाधान व्यक्त केले.

## चिमूर बस स्थानकात अद्यापही पाणी टंचाई - विलास डांगे



**महासागर प्रतिनिधी**

**नेरी, दि. २८ मार्च :** चिमूर बसस्थानकात अद्यापही पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली नाही याबाबत वृत्तपत्रातुन प्रकाशित बातम्यांची दखल चिमुर बस आगार व्यवस्थापक यांनी घेतली नसल्याने प्रवाशांना फार मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

अधिकारी यांचे कडून जाणीवपूर्वक प्रवाशांना पाणी मिळू नये यासाठी मोटार बंद करून ठेवतात व नाथजल पाणी विक्रेते यांचा २० लिटरचा पाणी घ्यावा या हेतूने टँचाई दाखवली जात आहे तसेच प्रायव्हेट खासगी वाहने बस आगारचे अगदी गेटवर लावून प्रवाशी बस ऐवजी खासगी बस ने प्रवास करीत आहेत त्यामुळे रा प चिमूर आगार चे दररोज लाखो रुपयाचे नुकसान होत आहे वरिष्ठ अधिकारी यांनी दखल घ्यावी असेच चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वच बस आगारारात दोन उपहार गृह दिले काय कि जिल्ह्यातील सर्वच स्नेक बार धारक उपहारगृह चालवत आहेत याकडेही लक्ष घालावे विलास डांगे माजी जिल्हा परिषद सदस्य यांची मागणी

## राज्यस्तरीय समितीमध्ये चंद्रपूर जिल्हाधिकाऱ्यांचा समावेश

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ मार्च :** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ अंतर्गत जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी व तहसीलदार या-च्या कार्याविषयक नियमपुस्तिका तयार करण्याकरिता विभागीय आयुक्त कोकण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या समितीमध्ये सदस्य म्हणून चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांचा समावेश करण्यात आला आहे.

यापूर्वी १८ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार गठीत समितीमध्ये यवतमाळ जिल्हाधिकारी ऐवजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी असा बदल करण्यात आला असून चंद्रपूर आणि नांदेड जिल्हाधिका-यांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. याबाबतचे सुधारीत शुध्दीपत्रक आज २५ मार्च २०२५ रोजी निर्गमित करण्यात आले. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ अंतर्गत जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी, तहसीलदार यांची कार्यविषयक नियमपुस्तिका तयार करण्याबाबत गठीत समितीचे अध्यक्ष हे कोकण विभागाचे विभागीय आयुक्त असून सदस्य सचिव म्हणून कोकण विभागाचे उप आयुक्त (महसूल) हे आहेत. इतर सदस्यांमध्ये जिल्हाधिकारी चंद्रपूर, अहिल्यानगर, जालना, जळगाव, नांदेड यांचा समावेश आहे.

# लावारी (म.) शाळेतील विद्यार्थ्यांचे नवोदय परीक्षेत १००टक्के यश !



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. २८ मार्च :** तालुक्याच्या टोकावर नयनरम्य डोंगरांच्या रांगानी सभोवताल जंगलानी वेढलेल्या अवघड क्षेत्रात वसलेले लावारी (म.) हे गाव आता आपल्या शिक्षणाच्या विशेष प्रगतीमुळे चर्चेत आलेले आहे. येथील जि प प्राथमिक शाळेचे शिक्षक हेमचंद्र लोहकरे व विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मेहनतीच्या जोरावर नवोदय परीक्षेत १००% यश मिळवले आहे.या शाळेतील इयत्ता पाचवीतील ४ पैकी ३ विद्यार्थ्यांनी जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा दिली आणि सर्व १००% विद्यार्थी पात्र ठरले!

यश संपादन करणारे विद्यार्थी श्लोक हेमचंद्र लोहकरे हा शिक्षकाचा मुलगा असून दीप दादाराम निकोडे , सोहम रवींद्र गुरनुले ही मुले अत्यंत गरीब परिस्थितीतून आलेली आहेत. शिक्षणाची आवड, शिक्षकांचे मार्गदर्शन व मेहनत याच्या जोरावर त्यांनी हे मोठे यश संपादन केले आहे.

**दुर्गम भागात शिक्षणाची लढाई ५ वी वर्ग गावातच सुरू!**

लावारी (म.) गाव तालुक्याच्या टोकावर, जंगल भागात असल्याने तसेच पावसाळ्यात जवळच्या गावात शिकण्यासाठी अडचण येत असल्याने या वर्षी गावातच ५ वा वर्ग सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय गावासाठी शिक्षणाच्या दृष्टीने मैलाचा दगड ठरला आहे.

**२०१८ पासून शिक्षणाचा नवा अध्याय!**

सन २०१८ मध्ये हेमचंद्र लोहकरे आणि द्रोणेश्वर पिसे गुरूजी शाळेत रुजू झाले आणि त्यानंतर शाळेच्या विकासाला वेग आला. त्यांनी केवळ विद्यार्थ्यांचे शिक्षणच नव्हे, तर शाळेच्या सर्वांगीण विकासावर भर दिला. स्वत:च्या मुलालाही याच शाळेत शिकवलं. गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे, अध्यापनात तंत्रज्ञानाच वापर, शोभिवंत परिसर यामुळे पटसंख्या वाढली. **शाळेची उल्लेखनीय कामगिरी:** मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमात २०२३-२४ मध्ये चिमूर तालुक्यात प्रथम परसबाग स्पर्धेत चंद्रपूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक

**ग्रामस्थांचा अभिमान आणि आनंद!** या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे. ग्रामस्थ, शिक्षक, शा.व्य. समिती आणि पालकांनी शिक्षकांचे व विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक केले असून, शाळेचा हा उज्ज्वल प्रवास असाच सुरू राहावा, अशी सर्वांचीच अपेक्षा आहे. या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## बिल्ट ग्राफिक पेपर प्रोडक्शन लिमिटेड व पहेल मल्टीपर्पज सोसायटी अंतर्गत २५ कुटुंबांना शौचालय बांधून देण्याचा स्तुत्य उपक्रम



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. २८ मार्च :** गावकऱ्यांच्या आरोग्य आणि स्वच्छतेच्या गरजा ओळखून बिल्ट ग्राफिक पेपर प्रोडक्शन लिमिटेड, बल्लारपूर आणि पहेल मल्टिपर्पज सोसायटी, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने २५ कुटुंबांना सामाजिक दायित्व विभाग( सीएसआर) अंतर्गत मोफत शौचालय बांधून देण्याचा निर्णय घेण्यात येऊन यासाठी ग्रामपंचायत कळमना येथे शौचालय बांधकामासाठी भूमिपूजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणुन गटविकास अधिकारी धनंजय साळवे, विशेष अतिथी प्रवीण शंकर( हेड एच,आर, बिल्ट) व अजय डुरटकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष सरपंचा सरला परेकर तर प्रमुख पाहुणे उपसरपंच रुपेश पोडे आणि ग्रामपंचायत सदस्य उपस्थिती होते.

कार्यक्रमाचे संचालन अंजुषा काकडे यांनी केले, तर आभार शितल नागपुरे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सूरज कोंगरे यांनी व पहेल टीम ने सहकार्य केले.हा उपक्रम गावकऱ्यांच्या दैनंदिन जीवनात मोठा बदल घडवून आणणारा ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. स्वच्छ भारत अभियानाला हातभार लावणाऱ्या या स्तुत्य कार्याबद्दल गावकऱ्यांकडून समाधान व्यक्त करण्यात आले आहे.

# कारागृहातील बंदीवानांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. २८ मार्च :** सांस्कृतिक कार्य विभाग, मुंबईतर्फे 'जीवन गाणे गातच जावे', हा सांस्कृतिक कार्यक्रम मंगळवारी चंद्रपूर जिल्हा कारागृह येथे पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारागृह अधिक्षक अनुप कुमरे तर प्रमुख अतिथी म्हणून कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त भैयाजी येरमे, जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर, कौशल्य विकास अधिकारी रोशन गबाले, कारागृहाचे वरिष्ठ निरीक्षक नागेश कांबळे, सतीश सोनवणे, कमलाकर मिरासे, ॲड चैताली बोरकुटे – कटलावार आदी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना कारागृह अधिक्षक कुमरे म्हणाले, बंदिवानांना कारागृहात आनंदी वातावरणात जगण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याचे शासनाचे निर्देश आहे. यात सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्यातीलही कलागुणांना विकसीत करणे, चांगले वर्तन ठेवण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे आदींचा समावेश आहे. सहायक आयुक्त येरमे म्हणाले, आनंद हा आपल्यातून निर्माण झाला पाहिजे. चांगले काय आणि वाईट काय, याची पारख करून आपण ते स्वीकारावे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून आनंदी जीवन जगण्यास नक्कीच मदत मिळते. यावेळी जिल्हा माहिती अधिकारी येसनकर यांनीसुध्दा मार्गदर्शन केले.

यावेळी बंदीवासांसाठी योग नृत्य परिवारातर्फे सुरेश घोडके आणि समूह यांनी अधिवासांना योगा शिकवला. गुन्हेगाराची सायकॉलॉजी या विषयावर धनंजय तावडे यांनी मार्गदर्शन केले. गुन्हेगारीचे दुष्परिणाम व गुन्हे सोडल्यावरचे जीवन या विषयावर ॲडव्होकेट चैताली बोरकुटे-कटलावार यांनी मार्गदर्शन केले. कला श्री आर्ट फाउंडेशनच्या मुलींनी व शिक्षिका स्नेहा पारवेकर यांनी कथक व देशभक्तीपर नृत्य सादर केले. त्यानंतर बंदीवासांसाठी संस्कृती देशभक्ती प्रबोधनपर स्वरसुगम संगीत ऑर्केस्ट्रा सादर करण्यात आला. त्यात देशभक्तीपर थोर महापुरुषांवर व संस्कृती हा विषय घेऊन अतिशय दर्जेदार गीते सादर करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी तेजराज चिकटवार, वैशाख रामटेके, रोहित रामटेके, प्रदीप यमनूरवार व सुशील सहारे यांनी सहकार्य केले.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ * स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)






# शेफ व्हायचंय?

मित्रमैत्रिणींनो, तुम्ही रेस्टॉरंट्स, कॅफेमध्ये जेवायला जाता. तिथे छान छान पदार्थ मिळतात. या पदार्थांवर आकर्षक सजावट केलेली असते. कधी नेहमीच्याच पदार्थांना ट्विस्ट दिला जातो. हे सगळं शेफच्या मार्गदर्शनाखाली होत असतं. रेस्टॉरंट्समधल्या किचनचा सगळा ताबा शेफकडे असतो. मोठमोठ्या हॉटेल्समध्ये शेफना खूप मान असतो. हे कौशल्य विकसित करण्यासाठी तुम्ही कलनरी आर्टसशी संबंधित अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ शकता.

स्वयंपाकाची आवड असणाऱ्यांना हे क्षेत्र खुणावतं. शेफ बनण्यासाठी तुमच्यात प्रयोगशीलता, कल्पकता असायला हवी. काहीतरी नवं करून बघण्याची, नवं शिकत राहण्याची तयारी असायला हवी. भारतासह जगभरातल्या खाद्यपदार्थांचं, स्वयंपाकाच्या पद्धतींचं ज्ञान मिळवणं गरजेचं आहे. लोकांच्या आवडीनिवडींनुसार चविष्ट पदार्थ बनवण्याचं तंत्र तुम्ही अवगत करून घ्यायला हवं. यासोबतच संवादकौशल्य, संशोधनाची तयारी, व्यवस्थापनकौशल्य या बाबीही महत्त्वाच्या आहेत.

**कोण होणार?**

कोणत्याही शाखेतले विद्यार्थी कलनरी आर्टसकडे वळू शकतात. बारावीनंतर 'क्विजीन टेक्नॉलॉजी', 'हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी' किंवा 'हॉटेल मॅनेजमेंट' या विषयांमध्ये पदवी मिळवता येईल. यासोबत 'शेफ मॅनेजमेंट' या विषयात डिप्लोमा किंवा सर्टिफिकेट कोर्स करता येईल. पुरेसा अनुभवानंतर एक्झिक्युटिव्ह शेफ, सॉस शेफ, एक्सपिडिटर, कुक, कुक असिस्टंट म्हणून काम करू शकता. यासोबतच खाद्यपदार्थांशी संबंधित विविध कंपन्यांमध्येही संधी उपलब्ध असतात.




# उन्हाळ्यातला पेहराव

मुलांनो, आता उन्हाळा सुरू झाला आहे. तेव्हा या काळातील कपडे निवडताना काळजी घ्या. या उष्ण वातावरणात हलके आणि त्वचा श्वास घेऊ शकेल असे कपडे घालणे गरजेचे आहे. सूती किंवा लिनन कापड वापरले तर त्वचेला आराम दायक असते आणि ते घामही शोषून घेतात. म्हणूनच असे कपडे वापरा. कपड्यांचा रंग हलका असावा, कारण गडद रंग सूर्यप्रकाशात जास्त उष्णता शोषून घेतात. शर्ट आणि पँट्स किंवा शॉर्ट्स घालणे योग्य ठरेल. अशा कपड्यांमध्ये तुम्हाला आराम मिळेल. त्याचप्रमाणे बाहेर पडताना सनग्लासेस, हॅट किंवा कॅप वापरणेही गरजेचे आहे कारण या गोष्टी सूर्याच्या तीव्रतेपासून संरक्षण करतात.

**हे आहे गरजेचे**

**ठिपके जुळवा**



# एकसारखं टेन्शन येतंय?

छोट्या मित्रांनो, तुम्हाला कधीकधी ताणतणाव जाणवतो का? भीती वाटते का? असे होत असेल तर वेळीच आई-बाबांना सांगा कारण फार काळ या अवस्थेत राहिल्यास वाईट परिणाम बघायला मिळतात.

ताणतणावाच्या अवस्थेत शरीरात अचानक अ‍ॅड्रेनालाईन किंवा कॉर्टिसोल सारख्या ताण संप्रेरकांचा पूर येतो. परिणामी हृदयाचे ठोके वाढतात. रक्तदाब देखील वाढतो. म्हणजेच ताणतणाव केवळ हृदयावर आणि मनावरच नाही तर संपूर्ण शरीरावर परिणाम करतो. मात्र ताण उत्पन्न होण्याची परिस्थिती निवळल्यास तुम्हाला परत सामान्य वाटते. आधीसारखे बरे वाटू लागते. म्हणजेच आपले शरीर कमी प्रमाणात ताण सहन करण्यास तयार असते. परंतु ताण दीर्घकाळ किंवा दीर्घकालीन होतो तेव्हा मात्र वाईट परिणाम देणारा ठरतो, हे आपण लक्षात घ्यायला हवे.

**असं का होतं?**

याचे आपल्या शरीरावर अनेक वाईट परिणाम दिसू शकतात. जसे की, पोटात काहीतरी जाणवते. एक विचित्र अस्वस्थता किंवा वेदना जाणवू शकतात. तीव्र ताण बराच काळ राहिला तर हृदयाच्या धमन्यांमध्ये जळजळ देखील होऊ शकते. छाती भरुन आल्यासारखी वाटते. तणावाचा सामना करताना कोलेस्टेरॉलच्या पातळीवरही परिणाम होतो. म्हणूनच फार काळ तणावात राहू नका. तो टाळण्यासाठी कामाचे चांगले व्यवस्थापन करा. भरपूर मित्र बनवा आणि एकमेकांशी जोडलेले रहा. दररोज व्यायाम करायला विसरू नका. दररोज रात्री चांगली झोप घ्या. या सगळ्यामुळे तुम्ही फ्रेश आणि तणावमुक्त राहू शकाल.



## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) 'नोकिया' ही कोणत्या देशातली कंपनी आहे?
२) सूर्यमालेतला हिरवा ग्रह कोणता?
३) बुकर पुरस्कार मिळवणारी भारतातली पहिली महिला लेखिका कोण?
४) भारतीयांनी विकसित केलेला पहिला सुपर कॉम्प्युटर कोणता?
५) क्युबा या देशाचं चलन कोणतं?
६) 'उगवत्या सूर्याचा देश' असं कोणाला म्हटलं जातं?
७) पाण्याचा अभ्यास करणाऱ्या शास्त्रज्ञांना काय म्हणतात?
८) आयसीआरएचं पूर्णरुप काय?
९) जगातला सर्वात मोठा पक्षी कोणता?
१०) भारतातला सर्वात लहान केंद्रशासित प्रदेश कोणता?


उत्तरं : १) फिनलँड २) युरेनस ३) अरुंधती ४) परम ८००० ५) पेसो ६) जपान ७) हायड्रोलॉजिस्ट ८) इंडियन कौन्सिल फॉर रिसर्च ९) शहामृग १०) लक्षद्वीप

# तिखटपणा मोजायचाय?

तिखट, मसालेदार पदार्थांमध्ये आई मिरचीचा वापर करत असल्याचे तुम्ही बघत असाल. पण मिरचीचा तिखटपणा केवळ चवीनुसारच नाही तर एका वैज्ञानिक प्रमाणानुसार मोजला जातो हे तुम्हाला माहिती आहे का? चला तर मग, आज या 'स्कोव्हिल स्केल' बाबत जाणून घेऊ या.

हे स्केल एका युनिटमध्ये मिरचीचा तिखटपणा मोजते आणि मिरचीमध्ये कॅप्सेसिन नावाचा घटक किती असतो हे सांगते कारण या घटकाचमुळेच आपले तोंड पोळते. थोडक्यात स्कोव्हिल स्केल हे वैज्ञानिक स्केल मसालेदार अन्नाचा तिखटपणा मोजण्यासाठी वापरला जाते.

हे अमेरिकन फार्मासिस्ट विल्बर स्कोव्हिल यांनी १९१२ मध्ये विकसित केले. मिरचीचा तिखटपणा मोजण्यासाठी स्कोव्हिल ऑर्गनोलेप्टिक चाचणी केली जाते. यामध्ये, मिरचीचा अर्क पाण्यात मिसळला जातो आणि नंतर पॅनेलमध्ये बसलेली एक टीम किती प्रमाणात पाणी घालावे याची चाचणी करते




जेणेकरून त्या मिरचीचा तिखटपणा जाणवू नये. जितके जास्त पाणी लागेल तितकी मिरची तिखट समजली जाते.

आता काही प्रसिद्ध मिरच्यांचे स्कोव्हिल रेटिंग जाणून घेऊ या.

* **बेल पेपर** – ही सर्वात सौम्य मिरची आहे आणि त्यात तिखटपणा अजिबात नाही.

* **जलापेनो** – ३,५००–८,००० एसएचयू (स्कोव्हिल हीट युनिट्स)

ही मिरची भारतीय जेवणातही खूप लोकप्रिय आहे आणि तिचा तिखटपणा मध्यम असतो.

**माहिती असावे**

* हबानेरो – १००,०००–३५०,००० एसएचयू

ही मिरची खूप तिखट असते आणि ती खाणे खूप आव्हानात्मक असू शकते.

* **कॅरोलिना रीपर** – १,४००,०००–२,२००,००० एसएचयू

ही जगातील सर्वात तिखट मिरची मानली जाते.

* **पेपर एक्स** – ३,१८०,००० एसएचयू. पेपर एक्स ही आतापर्यंतची सर्वात तिखट मिरची असल्याचे म्हटले जाते आणि तिखटपणाबद्दल गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये तिची नोंद झाली आहे.




# असा असतो चतुर



मित्रांनो, तुम्ही चतुर नावाच्या कीटकासोबत कधी खेळला आहात का? काही मुले त्याच्या शेपटीला दोरा बांधून अघोरी खेळही खेळतात. हे अगदी चुकीचे आहे. पण तुम्हाला या कीटकाबद्दल माहिती आहे का? नसेल तर हे नक्की वाचा.

मित्रांनो, चतुरला इंग्रजीत ड्रॅगन फ्लाय आणि हिंदीत व्याधपतंग असे म्हणतात. जगभरात त्याच्या हजारो जाती आहेत. बर्फाळ प्रदेश सोडला तर उष्ण आणि दाट प्रदेशात चतुरांचा वावर आढळतो. त्याचे शरीर तीन भागांमध्ये बनलेले असते. पहिल्या भागात दोन पाय असतात. पायांचा उपयोग आधार घेण्यासाठी तसेच धरून बसण्यासाठी होतो. चालण्यासाठी मात्र पायांचा उपयोग होत नाही. या कीटकाचा प्रत्येक पंख स्वतंत्रपणे हलू शकत असल्यामुळे उडण्याची क्षमता प्रचंड असते. म्हणजेच चतुर ५० ते ६० किमी. वेगाने उडू शकतो. तो जोरदार वाऱ्याचा सामनाही सहजपणे करु शकतो. तो हवेत घिरट्या घालू शकतो तसेच एकाच जागी बराच काळ उडतही राहू शकतो.


चतुराच्या संरचनेवर आधारितच विमान तयार करण्याचे तंत्र वैज्ञानिकांनी विकसित केले, असे काहीजण मानतात.

चतुर दिसायला अगदी सुंदर असतात. त्याचे डोळेही सुंदर असतात. डोळ्यांचे नीट निरीक्षण केले असता छोट्या-छोट्या आकारात हजारो लेन्सेस दिसतात. म्हणून त्याची नजर 'क्लीअरकट व्हिजन' असल्याचे आपण म्हणतो. चतुरांना डोके कसंही, कुठेही वळवता येतं. त्यामुळे हव्या त्या कोनातून ते पाहू शकतात. चतुराला ३६० अंश कोनात दिसतं.

**भवताल**

चतुरांचं आयुष्यही एक गूढ प्रवास आहे. मादी आपली अंडी बहुधा तळ्याच्या किंवा डबक्याच्या काठावर तसेच चिखलात घालते. काही जातीत अंडी घालताना नर आणि मादी एकत्र उडतात. एकावेळेस मादी शेकडो ते हजारो अंडी घालते. काही आठवड्यात अंड्यांमधून अळ्या बाहेर पडतात. या अळ्या पूर्णपणे पाण्याखालीच जगतात. त्या कधी कधी दोन–तीन वर्षांपर्यंत पाण्यातच वावरतात पण पाण्यातून बाहेर पडताच अवघे सहा–सात महिनेच ते जगतात. जलचर छोटे किडे आणि मासे हे या अळ्यांचे भोजन असते.

# शेअर करा गुगल सर्च




मुलांनो, गुगल हे जगातलं सर्वात लोकप्रिय सर्च इंजिन आहे. इंटरनेट सर्फिंगसाठी तुम्ही गुगल क्रोमचा वापर करता. त्यावरचे सर्च रिझल्ट्स आपल्याला शेअर करायचे असतात. यासाठी यूआरएल कॉपी करून पेस्ट करण्याचा एक पर्याय आहे. यासोबत 'लेट मी गुगल दॅट फॉर यू' हा ऑप्शनही निवडला जातो. मात्र आता गुगलवरचे सर्च रिझल्ट्स थेट शेअर करता येणार आहेत. यासाठी गुगलने शेअर बटण उपलब्ध करून दिलं आहे. यामुळे अभ्यासाशी किंवा प्रोजेक्टशी संबंधित सर्च रिझल्ट्स झटपट शेअर करता येतील.

**स्मार्ट टॉक**

गुगल सर्च शेअर करण्यासाठी सर्वात आधी स्मार्टफोनमधलं गुगल अ‍ॅप ओपन करा. आता सर्च बारमध्ये जाऊन तुम्हाला हव्या असणाऱ्या माहितीसाठी सर्च द्या. यानंतर सर्च बारच्या उजव्या बाजूच्या शेअर आयकॉनवर टॅप करा. इथे रिझल्ट्स शेअर करण्याचे विविध पर्याय दिसतील. त्यापैकी एका पर्यायाची निवड करून तुमचे सर्च शेअर करता येतील. हा शेअरचा ऑप्शन सध्या फक्त अँड्रॉइडच्या बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे.

शेअर आयकॉनवर टॅप केल्यानंतर गुगल सर्च रिझल्ट्स शेअर करण्यासाठी एक लिंक उपलब्ध करून दिली जाईल. त्यात कॉपी फॉर क्लिपबोर्ड तसंच जीमेल, फेसबुक किंवा ड्रॉपबॉक्सच्या माध्यमातून शेअर करण्याचे पर्याय दिसतील. यापैकी एका पर्यायाची निवड तुम्ही करू शकता.

**धोका ओळखा**

### अशी घ्या काळजी



उन्हाळ्यात फिरताना काही धोके होऊ शकतात. त्यापासून बचाव करण्यासाठी खालील गोष्टी लक्षात ठेवा जसे की, कडक उन्हात फिरल्याने अंग जळजळते. सूर्याच्या तीव्र किरणांमुळे जळजळ होऊ शकते.

त्यामुळे घराबाहेर पडताना सनस्क्रीन लावणे आणि शक्यतो छत्री घेणे आवश्यक आहे. उन्हात फिरताना थकवा, मळमळ आणि गोंधळलेपण जाणवले तर थोडा वेळ विश्रांती घ्या. गारव्याला झाडाच्या सावलीखाली बसा. या काळात कीटकदंशापासून दूर राहण्यासाठी कीटकदंश प्रतिबंधक क्रीम किंवा स्प्रेचा अवश्य वापर करा.

**माहिती आहे?**

### असा तयार होतो माठ



उन्हाळ्यात आपण मातीच्या माठातील थंडगार पाणी पितो आणि तहान भागवतो. पण माठ तयार करण्याची प्रक्रिया तुम्ही जाणता का? मुलांनो, माठ तयार करण्यासाठी सर्वप्रथम गुळगुळीत आणि चिकट माती निवडली जाते. ती मऊ करण्यासाठी पाणी मिसळले जाते. नंतर चाकावर माती ठेवून हाताने किंवा साधनांचा वापर करून माठाचा आकार दिला जातो. माठाचा डोक्याचा भाग मोठा असतो. सजावटीसाठी त्यावर वेगवेगळे डिझाईन्स केली जातात. तयार झालेला माठाला थोडा वेळ उन्हात सुकवतात. नंतर त्यावर रंगकाम केले जाते. त्यामुळे तो सुंदर आणि टिकाऊ होतो.

**लक्षात घ्या**

### नको टीव्हीचा अतिरेक



टीव्ही जास्त पाहण्याचे काही तोटे आहेत. जसे की, टीव्ही जास्त पाहिल्याने शरिराची क्रियाशीलता कमी होऊ शकते. त्यामुळे वजन वाढणे आणि शरीर कमजोर होते. टीव्ही खूप वेळ पाहिल्याने डोळ्यांना ताण पडत असल्यामुळे डोळे दुखणे, चुरचुर, आणि दृष्टी कमी होणे हे त्रास संभवतात. सतत टीव्ही पाहण्यामुळे मानसिक विकासावरही परिणाम होऊ शकतो. त्याचबरोबर बाहेर खेळायला किंवा अभ्यास करण्यास वेळ मिळत नाही. मुख्य म्हणजे टीव्ही जास्त पाहण्यामुळे आपली सर्जनशीलता आणि शिकण्याची आवड कमी होऊ शकते. म्हणूनच सुट्टीच्या काळात टीव्ही कमी बघा आणि भरपूर खेळा.

# सीएम कार्यालयातील प्रतिक पडवेकर प्रशांत कोरटकर सोबत होता का?

## मदत करणारे कोण? काँग्रेसचा मुख्यमंत्र्यांना सवाल

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :



महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान करणारा तथाकथित पत्रकार प्रशांत कोरटकला तेलंगणातील मंचरेला येथून अटक करण्यात आल्याचे सरकारने जाहीर केले आहे.

परंतु अटक केली त्यावेळी कोरटकर सोबत मुख्यमंत्री कार्यालतील कर्मचारी प्रतिक पडवेकर होता, त्यांना सोबत घेऊनच कोल्हापूर पोलीस आले, हे खरे आहे का? याचा खुलासा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करावा, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केला आहे.

प्रशांत कोरटकर अटकेसंदर्भात गौप्यस्फोट करत अतुल लोंढे म्हणाले की, आम्हाला जी माहिती मिळाली आहे त्यानुसार प्रशांत कोरटकरला तेलंगणात अटक करण्यात आली त्यावेळी प्रतिक पडवेकर हा प्रशांत कोरटकर सोबत होता. मग त्यांना का लपवून ठेवले आहे, त्याला का दाखवत नाहीत.

महिनाभर प्रशांत कोरटकरला खरी मदत कोण करत होते, ते पुढे का येत नाही, हा महत्वाचा प्रश्न आहे. प्रशांत कोरटकरच्या अटकेसंदर्भात काही माहिती का लपवली जात आहे? हा प्रश्न पडला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे खरे प्रेमी असाल तर गृहमंत्र्यांनी सर्व माहिती जाहीर करावी. छत्रपती शिवाजी महाराज यांचा अपमान करणारा प्रशांत कोरटकर महिनाभर लपून बसला होता, त्याला कोणी साथ दिली, कोणाच्या आशिवार्दाने तो लपला होता याची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत आणि महाराष्ट्राच्या जनतेला ती जाणून घेण्याचा हक्क आहे असेही अतुल लोंढे म्हणाले.

# मोदींच्या भेटीआधी सौंदर्यीकरणासाठी जागा द्या!


## बहुजन समाज पक्षाची राज्य सरकारकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

पंतप्रधान नरेंद्र मोदी ३० मार्चला नागपूर दौऱ्यादरम्यान दीक्षाभूमीला भेट देणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर बहुजन समाज पक्षाने दीक्षाभूमीच्या सौंदर्यीकरण व विकास कार्यासठी शेजारची २१ एकर जमीन पंतप्रधान मोदींनी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

जागतिक कीतीर्चे स्मारक असलेल्या दीक्षाभूमीच्या सौंदर्यीकरण व विकास कामासाठी जागा अपुरी पडत आहे. या स्मारकाला पर्यटनाचा अ दर्जा मिळालेला आहे. मागील अनेक दिवसापासून कापूस संशोधन केंद्राची ५ एकर व आरोग्य विभागाची १६ एकर जागा परम पूज्यनीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमीला मिळावी यासाठी अनेक वर्षापासून मागणी सुरू आहे.

३० मार्च रोजी भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे नागपुरातील दीक्षाभूमी या ऐतिहासिक स्थळाला भेट देणार आहेत. या भेटीत त्यांनी ही जागा दीक्षाभूमीच्या विकासासाठी उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी बहुजन समाज पार्टी महाराष्ट्र प्रदेशचे मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी केली आहे.



भारतीय संविधानाचे हे ७५ वे वर्ष आहे. ज्या संविधानाने देश अखंड आहे. त्याच संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी अमानवीय जीवन जगणाऱ्या लाखो अनुयायांना मानवतावादी बुद्ध धम्माची दीक्षा दिली.

त्याच १४ एकर जागेवर बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभे आहे. त्याला नमन करण्यासाठी भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी नागपुरात येत असून जागे अभावी त्या दीक्षाभूमी स्मारकाची अत्यंत दुर्दशा झाली आहे. हे त्यांच्या निदर्शनात येईलच.

गेल्या वर्षी भुयारी वाहनतळच्या नावाने जागे अभावी चुकीचे नियोजन केल्याने २०० कोटी रुपयांच्या सौंदर्यीकरण व विकास कामाला १ जुलै २०२४ रोजी खीळ बसली. तेव्हापासून दीक्षाभूमी स्मारका शेजारच्या पूर्व व उत्तरेकडील जागा मिळवण्यासाठी शासकीय, प्रशासकीय व राजकीय स्तरावर अनेकांनी प्रयत्न केले, परंतु त्यात यश आले नाही. बसपाने यापूर्वी अनेक निवेदने दिलेली आहेत. मुख्यमंत्री फडणवीस यांनी लवकरच काम सुरू करीत असल्याची आश्वासने अनेकदा दिली असल्याचेही बसपाने म्हटले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा हा मतदार संघ आहे. नरेंद्र मोदी हे विदेशात जातात तेव्हा बुद्धाची जन्मभूमी भारत येथून आल्याचे सांगतात.

नाग नगरीतील जनतेला तथागत बुद्ध, बाबासाहेब व मानवतावादी विचारांचा प्रत्यय आणून देण्यासाठी स्थानिक राज्य व केंद्र शासन प्रशासनाने शासनाकडे पडून असलेली निरुपयोगी २१ एकर जमीन दीक्षाभूमी स्मारकाच्या स्वाधीन करून विना विलंब विकास कामाची सुरुवात करावी. कारण दीक्षाभूमी स्मारकाला २०१६ रोजी पर्यटनाचा अ दर्जा मिळाला आहे. त्यानुसार ही जागा अपुरी पडते आहे.

प्रधानमंत्री या भेटी दरम्यान कापूस संशोधन केंद्राची जागा देण्याची घोषणा करतील, अशी अपेक्षा बसपाने व्यक्त केली आहे.

# विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या आमदारकीला न्यायालयात आव्हान

## अजित पवारांचा शिलेदार अडचणीत?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २८ :

पिंपरी मतदारसंघाचे आमदार अण्णा बनसोडे यांच्या आमदारकीला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सदस्य अण्णा बनसोडे २०१९ पासून पिंपरी मतदारसंघातून आमदार आहेत. त्यापूर्वी, ते २००९ मध्ये आमदार म्हणून निवडून आले होते. परंतु २०१४ मध्ये शिवसेनेच्या गौतम चाबुकस्वार यांच्याकडून ते पराभूत झाले होते. वास्तविक २४ मार्च २०२५ रोजी महाराष्ट्र विधानसभेचे १९ वे उपसभापती म्हणून त्यांची नियुक्ती झाली आहे. यासह बनसोडे हे विविध राजकीय घडामोडींमध्ये सहभागी आहेत. मात्र, आता मुंबई उच्च



न्यायालयात त्यांच्या आमदारकीलाच आव्हान देण्यात आले आहे.

अण्णा बनसोडे हे सध्या महाराष्ट्र विधानसभेचे १९ वे उपसभापती आहेत. चिंचवड, पुणे, महाराष्ट्र येथे जन्मलेले बनसोडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (राष्ट्रवादी) प्रतिनिधित्व करतात आणि २०१९ पासून पिंपरीचे विधानसभेचे सदस्य (आमदार) आहेत. २००९ मध्ये पिंपरी येथून पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आल्यापासून बनसोडे यांचा राजकीय प्रवास सुरू झाला. २०१४ मध्ये ते शिवसेनेच्या गौतम चाबुकस्वार यांच्याकडून ही जागा हरले परंतु २०१९ मध्ये ते पुन्हा जिंकले.

या वर्षी, ते पिंपरी मतदारसंघातून पुन्हा निवडून आले. मार्च २०२५ मध्ये, बनसोडे यांनी महाराष्ट्र विधानसभेचे उपसभापती म्हणून पदभार स्वीकारला, या पदावर त्यांनी बिनविरोध निवड झाली. त्यांची नियुक्ती विधानसभेतील त्यांचा प्रभाव आणि राजकीय संबंध अधोरेखित करते. तीन वेळा आमदार आणि अनुसूचित जाती समुदायाचे प्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी दरमहा ५० हजार रुपये

## उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आदेश

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २८ :

क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीसाठी लाखो रुपये खर्च होत असतांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी तुटपुंजे अर्थसाहाय्य हा अन्याय आहे, अशी भूमिका हिंदु जनजागृती समितीच्या शिष्टमंडळाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर मांडली. या मागणीवर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी महसूल विभागाच्या सचिवांना (श्री शिवराजेश्वर मंदिरासाठी) दरमहा ५० हजार रुपये निधी वाढवून देण्यासाठी तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे लिखित आदेश दिले.



तसेच महसूल विभागाच्या सचिवांना दूरध्वनी करून मंदिरासाठी दरमहा २५० रुपयांऐवजी ५० हजार रुपये देण्याचे स्पष्ट आदेशही दिले. या वेळी शासनाची मदत मिळण्याआधी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी तातडीने वैयक्तिकरित्या महाराजांच्या मंदिरासाठी ५० हजार रुपयांचे साहाय्य करून एक चांगला पायंडाही पाडला. तसेच त्यांनी नियमितपणे मंदिरासाठी निधी घेऊन जाण्यासही सांगितले. हिंदु जनजागृती समितीच्या वतीने उपमुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

या प्रसंगी समितीच्या वतीने सतीश सोनार, रवि नलावडे आणि नांदेड येथील शिवसेनेचे आमदार आनंद बोंडारकर उपस्थित होते.

केंद्रात काँग्रेस सरकारच्या काळात वर्ष २०१२ पासून क्रूरकर्मा औरंगजेबाच्या कबरीसाठी निधी देणे सुरू करण्यात आले होते.

नोव्हेंबर २०२३ पर्यंत भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने औरंगजेबाच्या कबरीच्या देखभालीसाठी ६.५० लाख रुपयांहून अधिक निधी खर्च केला आहे. औरंगजेब याच्या कबरीच्या देखभालीसाठी निधी खर्च करणे महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचवणारे आहे. त्यामुळे हा निधी सरकारने बंद करावा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिरासाठी भरीव निधी द्यावा, अशी मागणी समितीने केली.

**सिंधुदुर्ग किल्ल्याचा विकास करा!**

छत्रपती राजाराम महाराजांनी स्वतः मालवण येथील सिंधुदुर्ग किल्ल्यावर बांधलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे हे एकमेव आणि प्राचीन मंदिर आहे. त्यामुळे येथे लाखो शिवप्रेमी आणि पर्यटक येतात. किल्ल्यावर बोटीने यावे लागते. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांची योग्य सोय करणे आवश्यक आहे. किल्ल्याचे सुशोभीकरण करणे, परिसरात सुंदर बगीचा तयार करणे, पर्यटकांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय, प्रसाधनगृह आणि गोड्या पाण्याच्या विहिरीचे सुशोभीकरण करणे यां सारखी अनेक विकास कामे तातडीने व्हावीत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

# नागपूर जिल्हा बँक नफ्यात आणणार

## प्रशासनाचा दावा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २८ :

सुमारे दीडशे कोटींचा घोटाळा झाल्यानंतर बडघाईस आलेल्या नागपूर जिल्हा सहकारी बँकेला पुढील दोन वर्षांत नफ्यात आणण्याचा विश्वास या बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांनी व्यक्त केला. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत २००२ मध्ये १५० कोटींहून अधिक रुपयांचा घोटाळा उघडकीस आला होता. ही बँक पूर्वपदावर यावे म्हणून प्रयत्न सुरू झाले आहेत. या बँकेवर महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला प्रशासक म्हणून नेमणूक करण्यात येत आहे. अशा प्रकारे महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची संस्थात्मक प्रशासक म्हणून नेमणूक होत आहे.

व्यक्तीगत प्रशासकांच्या मर्यादा व आजवरचा अनुभव पाहता, राज्य सहकारी बँकेने सुचविलेला संस्थात्मक प्रशासक हा पर्याय राज्य शासनाने मान्य करुन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची नेमणूक संस्थात्मक प्रशासक म्हणून नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर केला आहे.

संस्थात्मक प्रशासक या अनोख्या मॉडेलची सुरुवात म्हणजे परिवर्तनाची सुरुवात असे मानन्यास हरकत नाही. यामुळे काही सक्षम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी अडचणीत असलेल्या आपल्या सहयोगी दुसऱ्या जिल्हा बँकेचे व्यवस्थापन चालविण्यास घ्यावे व स्वतःची सर्व साधनसामुग्री व यंत्रणा अडचणीतील जिल्हा बँकांना सक्षम करण्यासाठी वापरल्यास महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेली सहकारातील त्रिस्तरीय रचना निश्चितच सक्षम होईल असा विश्वास अनास्कर यांनी व्यक्त केला.

राज्य सहकारी बँकेस संस्थात्मक प्रशासक म्हणून नेमल्याने नागपूर जिल्हा बँकेच्या सक्षमीकरणासाठी राज्य सहकारी बँकेची सर्व साधने, संसाधने, तज्ञ सेवकवर्ग, निधी व मालमत्ता यांचा वापर करणे शक्य होणार असल्याचे ते म्हणाले.

: साप्ताहिक संवाद :

# एटीएमचे व्यवहार महागणार

येत्या १ मे पासून एटीएम मधून पैसे काढणे महागणार आहे. रिझर्व्ह बँकेने अधिसूचना जारी करून 'इंटरचेंज फी 'वाढविण्याची घोषणा केलेली आहे. जे ग्राहक आर्थिक व्यवहारांसाठी एटीएम वर अवलंबून आहेत, त्यांना मोफत व्यवहारांची मयार्दा पूर्ण झाल्यावर अतिरिक्त शुल्क भरावे लागणार आहे. याच अनुषंगाने अर्थतज्ज्ञ विश्वास उटगी यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**१ मे पासून एटीएम मधून पैसे काढणे महागणार आहे ते नेमके कसे?**

○ रिझर्व्ह बँकेने नुकतीच जी अधिसूचना जारी केलेली आहे त्यानुसार १ मे पासून एटीएम मधून पैसे काढणे महागणार आहे. ग्राहकांची पैसे काढण्याची मोफत मर्यादा पूर्ण झाल्यानंतर प्रत्येक आर्थिक व्यवहारासाठी अतिरिक्त दोन रुपये मोजावे लागणार आहेत. या शुल्कवाढीमुळे आता एटीएम मधून पैसे काढताना प्रति व्यवहार १९ रुपये द्यावे लागणार आहेत.

यापूर्वी हे शुल्क १७ रुपये होते. याशिवाय नॉन फायनांशियल ट्रान्सक्शन म्हणजेच बॅलन्स चौकशीसाठीचे शुल्क एक रुपयाने वाढणार आहे. याचा अर्थ आता खात्यातील शिल्लक तपासण्यासाठी आता प्रति व्यवहार ७ रुपये मोजावे लागणार आहेत.

**इंटरचेन्ज फी म्हणजे काय?**

○ एटीएम इंटरचेन्ज फी म्हणजे एका बँकेने दुसऱ्या बँकेच्या एटीएम सेवा वापरण्यासाठी दिलेले शुल्क आहे. जेंव्हा एखादा ग्राहक त्याच्या बँकेच्या ऐवजी दुसऱ्या बँकेच्या एटीएमचा वापर करतो किंवा पैसे काढतो, तेंव्हा संबंधित बँक त्या व्यवहारासाठी शुल्क आकारते. हे शुल्क ग्राहकांकडून थेट घेतले जात नसले तरी बँकेचा व्यवहाराचा एक भाग म्हणून बँके ते वसूल करते.

**या नियमाचा लहान बँकांना फटका बसणार आहे का?**

○ शुल्क वाढीमुळे लहान बँकांचे ग्राहक प्रभावित होऊ शकतात. लहान बँक त्यांच्या पायाभूत सुविधा आणि संबंधित सेवांसाठी मोठ्या वित्तीय संस्थांवर अवलंबून असतात. त्यामुळे वाढत्या खर्चाचा फटका या लहान बँकांना बसू शकतो. लहान बँकांकडे स्वतःचे एटीएम कमी असतात अस्तित्वात असणारे एटीएम हे अनेकदा देखभालीसाठी किंवा दुरुस्तीसाठी बंद असतात. त्यामुळे लहान बँकांच्या ग्राहकांना मोठ्या बँकांच्या एटीएमवर अवलंबून राहावे लागते. एटीएम वाढल्यामुळे लहान बँकांच्या ग्राहकांवर हा अतिरिक्त बोजा पडणार आहे.

लोकरंग

# बिर्ला ओपस पेंट्सचा मुंबई आणि नवी मुंबईत पेंट स्टुडिओ

आदित्य बिर्ला ग्रुपच्या ग्रासिम उद्योगांतर्गत ग्रासिम इंडस्ट्रीजचा एक भाग असलेल्या बिर्ला ओपस पेंट्सने मुंबई आणि नवी मुंबई येथे नवीन बिर्ला ओपस पेंट स्टुडिओ (कंपनीच्या मालकीचे आणि कंपनीद्वारा संचालित स्टोअर) सुरू केल्याचे जाहीर केले.

गुरुग्राम आणि लखनौ पाठोपाठ ब्रँडने केलेला हा विस्तार इनोव्हेशन, प्रीमियम ऑफरिंग्ज आणि एक खराखुरा गुंतवून ठेवणारा ग्राहक अनुभव यांच्या माध्यमातून पेंट आणि डेकोर उद्योगात परिवर्तन आणण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेची ग्वाही देतो. आगामी महिन्यांमध्ये बंगळूर, दिल्ली, हैदराबाद, कोलकाता, जयपूर, अहमदाबाद आणि सुरत येथे अतिरिक्त एक्सपिरीयन्स सेंटर्स उघडण्याची कंपनीची योजना आहे.

हे दोन नवे बिर्ला ओपस पेंट स्टुडिओ पारंपरिक पेंट दुकानांच्या पलीकडे जाऊन सर्जनशीलता आणि प्रेरणा यांचे केंद्र म्हणून डिझाईन करण्यात आले आहेत. ही अशी एक्सपिरीयन्स सेंटर्स असतील, जी ग्राहकांना नवनवीन कल्पनांचा शोध घेण्यास तसेच अगदी जिवंत वातावरणात रंगांचा स्पर्श, फील आणि अनुभव घेण्यास मदत करतील. येथे शेडची निवड, टेक्श्चर्स आणि रंग लावण्याच्या टेकनिकच्या बाबतीत ग्राहकांना पर्सनलाईज्ड गाईडकडून उत्तम मार्गदर्शन मिळू शकेल. येथील प्रगत व्हिज्युअलाईझेशन टूल्स घरमालकांना आपण निवडलेला रंग रियल-लाइफ सेटिंगमध्ये कसा दिसेल याचा प्रीव्ह्यू देतील. पेंट स्टुडिओमध्ये परिपूर्ण डेकोर सोल्यूशनसाठी पेंट व्यतिरिक्त वॉलपेपर्स, डिझाईनर फिनिश आणि स्पेशलिटी कोटिंगचे पर्याय देखील बघायला मिळतील.




: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com



# बीइंग ह्युमन फाऊंडेशनकृत नाशिक मालेगाव येथे हृदयरोग शिबिर

बॉलिवूड सुपरस्टार सलमान खानने बीइंग ह्युमन फाऊंडेशनच्या माध्यमातून अलीकडेच, नाशिकमधील मालेगाव येथे हृदयरोग विषयक शिबिराचे आयोजन केले होते. हे शिबीर २०० हून अधिक मुलांकरता जीवन संजीवनी ठरले. या शिबिरात त्यांच्या आरोग्यविषयक कोणत्याही संभाव्य समस्या ओळखण्याकरता मोफत हृदय तपासणी तसेच आणि इको चाचणी करण्यात आली.

बीइंग ह्युमन फाऊंडेशनतर्फे गरजू व्यक्तींना आरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. याच मोहिमेचा एक भाग म्हणून हे हृदय विषयक शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात वंचित पार्श्वभूमी असलेल्या मुलांमधील हृदयाशी संबंधित आजार लवकर ओळखणे आणि त्या आजाराला प्रतिबंध करण्यावर लक्ष केंद्रित केले गेले. हृदयविकाराचा धोका अथवा समस्या समजून घेण्याकरता इको चाचणी करण्यात आली, जेणे करून हृदयविकार आढळून आल्यास त्यावर त्वरित उपचार करता येईल. एक मानवतावादी व्यक्ती या अर्थाने सलमान आपल्या प्रसिद्धीचा आणि संपत्तीचा वापर वंचितांच्या जीवनात आनंद फुलवण्याकरता करत आहे. प्रामुख्याने, आरोग्य सेवा, शिक्षण आणि बालकल्याण या क्षेत्रांत सलमानने प्रभावी काम केले आहे.

# चारित्र्याच्या संशयावरून पत्नीची हत्या

## विद्युत पंपाच्या लोखंडी बॉक्समध्ये लपवला मृतदेह

■ वृत्तसंस्था, सांगली, दि. २८ :

पत्नी व दोन मुलांसोबत मुंबईहून गावी आलेल्या एका व्यक्तीने चारित्र्याच्या संशयावरून आपल्या पत्नीचा गळा आवळून खून केल्याची घटना सांगली जिल्ह्यात घडली.

आरोपीने पत्नीची हत्या करून तिचा मृतदेह विद्युत मोटारीच्या लोखंडी बॉक्समध्ये लपवला. यामुळे मेरठच्या सौरभ राजपूत हत्याकांडाची आठवण ताजी झाली आहे. आरोपी पती पोलिसांना शरण आला आहे.

सांगली जिल्ह्यातील मांगले येथे ही घटना घडली. प्राजक्ता मंगेश कांबळे (२८) असे मृत महिलेचे, तर मंगेश चंद्रकांत कांबळे असे आरोपी पतीचे नाव आहे. मंगेश व त्याची पत्नी आपल्या शिवम (६) व शिवकन्या (३) या २ मुलांसह ४ दिवसांपूर्वी मुंबईहून मांगले या आपल्या गावी आले होते. ते मंगेशचा भाऊ नीलेशकडे राहत होते. नीलेश हा आपल्या आईसोबत मांगले - वारणानगर रस्त्यावरील ज्योतिबा मंदिरासमोरील रामचंद्र वाघ यांच्या घरात भाड्याने राहतो. तिथे ही घटना घडली.

नीलेश व त्याची आई देववाडी येथे एका कार्यक्रमासाठी गेले होते. त्यांच्या गैरहजेरीत मंगेश व प्राजक्ता यांच्यात चारित्र्याच्या संशयावरून भांडण झाले. हा वाद एवढा विकोपाला गेला की, मंगेशने दारूच्या नशेत ओढणीने गळा आवळून प्राजक्ताचा खून केला. त्यानंतर प्राजक्ताचा मृतदेह लपवण्याचा प्रयत्न केला.

यासाठी त्याने प्राजक्ताच्या मृतदेहाचे हातपाय मोडले. त्यानंतर घराच्या एका खोलीत घरमालकाने ठेवलेल्या विद्युत पंपाच्या मोडक्या लोखंडी पेटीत तिचा मृतदेह कोंबला. या घटनेनंतर मंगेशने नीलेशला फोन करून शिराळ्याला जाण्यासाठी गाडी घेऊन ये असा फोन



केला. त्यानुसार नीलेश देववाडीतून तत्काळ मांगले येथे पोहोचला. नंतर मंगेश गाडी घेऊन शिराळ्याला गेला. नीलेश घरी पोहोचला तेव्हा मंगेशचा मुलगा शिवम हा घराच्या अंगणात बसून रडत होता.

तेव्हा नीलेशने काय झाले रडत का आहेस? असे विचारत त्याच्या आईची विचारणा केली. त्यानंतर चिमुकल्या शिवमने घडलेला प्रसंग सांगितला. नीलेशने बहिणीला व मेहुण्याला घरी बोलावून त्यांना हा प्रकार सांगितला. त्यानंतर या तिघांनी मंगेशला गावातीलच गोरक्षनाथ मंदिराजवळ गाठले.

मंगेशने आपण आपल्या पत्नीचा खून करून तिचा मृतदेह इलेक्ट्रिक पंपच्या पेटीत लपवल्याची कबुली दिली. भाऊ, बहीण व मेहुण्याच्या सूचनेनुसार शिराळा पोलिसांना शरण आला. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.

# पैशाच्या वादातूनच शेतकऱ्याचा खून

■ वृत्तसंस्था, हिंगोली, दि. २८ :

कळमनुरी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या समोरील ढाब्याच्या बाजूस पैशाच्या वादातूनच उमरा येथील शेतकऱ्याचा खून झाल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले असून या प्रकरणी कळमनुरी पोलिस ठाण्यात एका व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

कळमनुरी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या समोरील दुकानाच्या बाजूस एका ढाब्याजवळ एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला होता. चौकशीमध्ये सदर मृतदेह उमरा (ता.कळमनुरी) येथील शेतकरी ग्यानबाराव वडकुते (५०) यांचा असल्याचे स्पष्ट झाले होते.

या प्रकरणात गणपतसिंह टाक (रा. कळमनुरी) याचा हात असल्याची माहिती मिळाल्यावरून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याच्या प्राथमिक चौकशीमध्ये त्यानेच पैशाच्या कारणावरून ग्यानबाराव यांचा खून केल्याचे स्पष्ट झाले आहे.

# ताडोबात जंपिंग सफारी वाहन पर्यटकांच्या सेवेत

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. २८ :

उन्हाळा बघता ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये जंपिंग सफारी वाहनांची संख्या १५ पर्यंत वाढवण्यात आली आहे, ज्यामुळे पर्यटकांना अधिक सुलभ आणि उत्तम सफारीचा अनुभव मिळेल.

ताडोबा प्रशासनाने कोलारा गेट येथून १० खुटवंडा गेट येथून ४आणि झरी गेट येथून १ वाहनाला परवानगी दिली आहे. ताडोबाच्या विविध रिसॉर्टमध्ये राहणाऱ्या आणि जंगल सफारीचा आरामदायी अनुभव घेऊ इच्छिणाऱ्या पर्यटकांसाठी हा निर्णय विशेष फायदेशीर ठरणार आहे.



ताडोबा प्रकल्पात जंपिंग सफारी वाहनांची संख्या वाढल्याने पर्यटकांना सहज सफारी उपलब्ध होईल. त्यामुळे पर्यटकांचे सफारी मिळाली म्हणून समाधान होईल. शिवाय ताडोबाच्या इको-टूरिझमलाही चालना मिळेल. यामुळे स्थानिक मार्गदर्शक, चालक आणि पर्यटनाशी संबंधित इतर लोकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होईल.वन्यजीव प्रेमींसाठी ही सुवर्णसंधी आहे, कारण ते आता वाघ, बिबट्या, अस्वल, जंगली कुत्रे आणि इतर वन्यप्राण्यांचे अधिक बारकाईने निरीक्षण करू शकतात.

जंपिंग सफारी वाहने ही खास डिझाइन केलेली जिप्सी आहेत,. ज्यात आरामदायी आसन, उन्ह व पाऊस या पासून बचावासाठी छतावर शेड्स आणि उत्तम आसन व्यवस्था आहेत. ही वाहने ताडोबाच्या क्षेत्र संचालकांकडे नोंदणीकृत आहेत आणि जेव्हा पर्यटकाने सफारीचे ऑनलाइन बुकिंग केले असेल तेव्हाच त्यांना परवानगी दिली जाते. पर्यटकांना रिसॉर्टचे जिप्सी वाहनाने सफारी करायची असल्यास सामान्य जिप्सी भाड्याचे संपूर्ण शुल्क भरावे लागते आणि सफारी गेटवर १००० रुपये अतिरिक्त शुल्क भरावे लागते.